# परमानंदाचा स्त्रोत

## (एक अज्ञात चंद्रकांतमणी)

### महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे जीवन चरीत्र



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दुरध्वनी :

किंमत : दहा रुपये


| अनुक्रमाणीका | पान नं. |
|---|---|
| भक्त मंडळाचे मनोगत | १ |
| लेखकाचे मनोगत | २ |
| चरित्र लिहिण्याचा उद्देश | ४ |
| स्वामीजींचा परिचय | ६ |
| स्वामीजींचा जन्म | ७ |
| स्वामीजींचे बालपण | ७ |
| स्वामीजींचे शालेय शिक्षण | ८ |
| स्वामीजींबाबतची भविष्यवाणी | ८ |
| स्वामीजींना लाभलेले सुसंस्कार | ९ |
| सद्‌गुरुची प्राप्ती | ९ |
| स्वामीजींचे अध्यात्म व कॉलेज शिक्षण | ११ |
| आईची इच्छापूर्ती | १२ |
| वेरुळ आश्रमातील स्वामीजींचा दिनक्रम | १४ |
| वेरुळ आश्रमातील अध्यात्म साधना | १५ |
| संन्यास दीक्षेचा स्वीकार | १५ |
| गुरुदेवांचे महानिर्वाण व स्वामीजींचे कठोर साधनेसाठी हिमालयात प्रस्थान | १८ |
| हिमालयातील कठोर तप - साधना | १८ |
| हिमालयातील दिव्यदर्शन | १९ |
| एका दिव्य योग्याचे दर्शन व आत्मसाक्षात्कार | २१ |
| हिमालयातून स्वामीजी परत महाराष्ट्रात येण्याचे कारण | २२ |
| महाराष्ट्रात परत आत्मसाधनेत निमग्न | २३ |
| स्वामीजींचे तपोभूमीत आगमन | २३ |
| तपोभूमीचा कायाकल्प | २५ |
| भांगसीमाता गडाचा जिर्णोध्दार | २७ |
| स्वामीजींचा महामंडालेश्वर पदाभिषेक सन्मान | २९ |
| भांगसीमाता गडाच्या चरणाशी भव्य आश्रमाची निर्मिती | ३० |
| गुरूकूलाची निर्मिती | ३१ |
| गौशाळेची निर्मिती | ३४ |
| स्वामीजींचे तीर्थभ्रमण | ३५ |
| स्वामीजींच्या प्रवचनाचा शुभारंभ व प्रभाव | ३७ |
| स्वामीजींचे आचार-विचार | ३९ |
| स्वामीजींची निर्लोभ, निष्काम वृत्ती | ३९ |
| स्वामीजी व चमत्कार | ३९ |
| स्वामीजींचा शिष्य परिवार | ४० |
| स्वामीजींची महानता | ४० |
| स्वामीजींची आरती | ४२ |

## भक्त मंडळाचे मनोगत

श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांचे परम्‌शिष्य श्री. श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या संर्दभात 'परमानंदाचा स्त्रोत' (एक अज्ञात चंद्रकांतमणी) : श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज हे अल्पचरित्र प्रसिद्ध करतांना आम्हास परम् आनंद व अत्यंत धन्यता वाटत आहे. त्याचबरोबर या कृतीने स्वामीजी नाराज तर होणार नाहीत ना? याबद्दल भय देखील वाटत आहे. भय संकोच व परम आनंदाच्या संमिश्र भावनांच्या गोंधळांत असतानाच हे चरित्र प्रसिद्ध करण्याची जी प्रेरणा झाली ती भगवान शिवाची व सद्गुरु संत जनार्दन स्वामी महाराजांचीच प्रेरणा आहे, हे मानल्याशिवाय गत्यंतर नाही.

गोंधळलेल्या मनःस्थितीत असतांनाच हे अल्पचरित्र प्रसिद्ध केले जात असले तरी या अल्पचरित्रापासून असंख्य साधकांना, भक्तांना, भोगी-त्यागी, व्यसनी व मुमुक्षू जीवांना स्वामीजींच्या या अल्पचरित्रपर पुस्तकापासून महान असा जीवनाचा आदर्श मिळणार आहे. त्यामुळे त्यांना जीवनात परमानंदाची प्राप्ती होणार आहे. त्या परमानंदची प्राप्ती करुन देतांना आम्हासदेखील खारीचा वाटा मिळणार आहे. ते अल्पसे का होईना, सद्भाग्य आम्हास मिळावे म्हणून हे अल्पचरित्र आम्ही प्रकाशित करीत आहोत. तेव्हा हे अल्पचरित्र आपण वाचा व दुसऱ्यांना वाचण्यास देऊन सर्वांच्या हृदयात आनंदच काय, परमानंद निर्माण करण्यास सहकार्य करा.



## लेखकाचे मनोगत

परमानंदाचा स्त्रोत (एक अज्ञात चंद्रकांतमणी) श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज हे अल्पचरित्र श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांचे परमशिष्य श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्यासंदर्भात लिहिले आहे. श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज हे खरोखरच एक परमानंदाचे स्त्रोत आहेत. त्यांच्या सान्निध्यात जो जातो त्याला सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांनी दिलेल्या आशीर्वादाप्रमाणे परमानंदाची प्राप्ती होते यात तिळमात्र शंका नाही. कारण नित्य-नियम विधीत श्लोक आहे की, *'गुरु वाक्यं सदा सत्यं'* श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांनी *'आनन्दं परमानन्दं कैवल्य पद गामिनम्। नमामी शिरसा देवं किं नो मृत्युः करिष्यती।। हा श्लोक म्हणत यांचे नाव 'श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज'* ठेवा असे म्हणून नामकरण करुन संन्यास दीक्षा दिली होती. त्यानंतर नावाबद्दलचा खुलासा करतांना ते स्वामीजींना म्हणाले होते की, 'तुमच्या सान्निध्यात जे येतील त्यांना आनंदच काय पण परमानंदाची प्राप्ती होईल ते कालभयापासून निवृत्त होऊन कैवल्य म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेतील.' हा त्यांनी त्यावेळेस दिलेला आशीर्वाद आज अक्षरशः खरा ठरत आहे. असंख्य व्यक्तींच्या जीवनात स्वामीजींच्या सहवासाने परमानंद प्राप्त होत आहे.

कमळ उमलल्यानंतर जसे भ्रमर त्या कमळाकडे आकर्षिले जातात व तेथे जाऊन मकरंद सेवन करतात त्याचप्रमाणे आज असंख्य मुमुक्षू, साधक, भक्तरुपी भ्रमर स्वामीजींच्या सान्निध्यात जाऊन अध्यात्म परमानंदरुपी मकरंद सेवन करत आहेत. असे असले तरी स्वामीजींचा एकांतप्रिय अलिप्त स्वभाव जगत्प्रसिद्धी पासून निर्लिप्तता, अहंकारशून्य वृत्ती व आपल्याच परमानंदात मस्त राहण्याची सहज स्वभाव प्रवृत्ती यामुळे असंख्य व्यक्ती त्यांच्या आध्यात्मलाभापासून वंचित आहेत. अशा मुमुक्षू जनांना अल्पसी कल्पना यावी म्हणून हे अल्पचरित्र लिहून ते प्रसिद्ध करावे असा विचार मनात आला.

परंतु प्रत्यक्षात ज्या वेळेस लिहिण्यास सुरुवात केली त्यावेळेस प्रथम काही सुचेनासे झाले. कारण नाव - गाव, कुळ - गोत्र, आई - वडिल, भाऊ - बहिण या सर्वांचा त्याग करुन सर्वसंग परित्याग केलेल्या मोह - ममतारहित संन्याशाचे चरित्र लिहिणे तेवढे सोपे नाही, हे लक्षात आले. म्हणतात ना की,

**'गंगेचे मूळ व साधूचे कुळ शोधत बसू नये'** किंवा

**ऋषींची कुळे उच्चारिली जेणे । रौरवी तेणे वस्ती केली ।।**

या जनाबाईच्या अभंगातील उक्तीप्रमाणे मनात असूनही त्यांचा जन्म मराठा (पाटील) कुळात झाला त्यांच्या आई - वडिलांचे नाव असे होते हे लिहिता आले नाही.

**जाती न पूछो साधू की, पुछ लीजिए ग्यान ।**
**मोल करो तलवार का, पडी रहने दो म्यान ।।**

या कबिराच्या उक्तीप्रमाणे तो सर्व भाग टाळून केवळ स्वामीजींचे अध्यात्म चरित्र भगवंताच्या व सद्गुरुच्या कृपेने लिहिण्याचा हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

स्वामीजींचे चरित्र सागराप्रमाने अगाध आहे व हे लिहिलेले चरित्र अत्यंत अल्प आहे. असे असले तरी भगवंत कृपेने जे लिहिले गेले ते आपण वाचले, त्याचे मनन केले, त्याचा निद्ध्यास धरला व ते आचरणात आणले तर इतरांप्रमाणे आपणासही परमानंदाची प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही असा माझा दृढ विश्वास आहे. हे अल्पचरित्र वाचून आपणास परमानंदाची प्राप्ती होवो हीच इश्वरचरणी प्रार्थना.

**लेखक**



**चरित्र लिहिण्याचा उद्देश :-** 'परमानंदाचा स्त्रोत (एक अज्ञात चंद्रकांतमणी) : श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज' असे वाचून आपल्या मनात निश्चितच जिज्ञासा निर्माण झालेली असणार की, परमानंदाचा स्त्रोत; एक अज्ञात चंद्रकांतमणी स्वामी परमानंदगिरीजी महाराज म्हणजे नेमके काय?

अशी जिज्ञासा केवळ आपल्याच मनात हे वाचून निर्माण झाली असे नव्हे तर हे वाचण्यापूर्वीदेखील अनेकांच्या मनात अशी जिज्ञासा निर्माण झालेली आहे त्या जिज्ञेसेची पूर्ती करावी, असा हा माझा अल्पसा प्रयत्न आहे.

चंद्रकांत मण्याबाबत यापूर्वी मी एका पुस्तकात वाचले होते. चंद्रकांतमणी म्हणजे असा मणी की जो स्वयंप्रकाशित असतो व त्या मण्याच्या सान्निध्यात जे दुसरे मणी येतात त्या मण्यांनादेखील हा चंद्रकांत मणी आपल्यासमान बनवितो. असा जो चंद्रकांत मणी असतो तो मात्र अत्यंत दुर्मिळ असतो. काही भाग्यवंतांनाच त्याचा लाभ होतो. भाग्याशिवाय किंवा भगवंताच्या कृपेशिवाय तो मिळणे अशक्य असते, त्याचप्रमाणे संत जन या जगात अत्यंत दुर्मिळ असतात. जसे......

**बहु अवघड आहे संत भेटी । परि जगजेठी कृपा केली ।।**

या वचनाप्रमाणे खरे संत मिळणे व त्यांची ओळख होणे अतिशय दुर्लभ आहे, मिळाले असेल तर ते भगवंताच्या कृपेशिवाय शक्य नाही. जसे भगवान शिवदेखील माता पार्वतीला म्हणतात....

**गिरीजा संत समागम सम न लाभ कछू आन ।**
**बिनु हरिकृपा न होइ सो गावही वेद पुराण ।।**

भगवंताच्या कृपेशिवाय खऱ्या संतांची प्राप्ती होणे अशक्य आहे. याचे एक कारण हे ही आहे की, खरे संत जगापासून स्वतःला अदृश्य, अलिप्त ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत असतात..... जसे श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज.

या जगात अनेक संत,महात्मे,योगी होऊन गेले. जोपर्यंत ते स्थूल शरीराने कार्य करत होते तोपर्यंत त्यांना सर्वसामान्य जग ओळखू शकले नाही, त्यांना जाणू शकले नाही, त्यांच्या दिव्य अध्यात्म शक्तीचा लाभ घेऊ शकले नाही. ते गेल्यानंतर आज मात्र त्यांच्या समाधीस्थानावर हजारो लोकांच्या रांगा लागतात. त्यांच्या

समाधीच्या दर्शनाने स्वतःला कृतार्थ माणतात. आज जेवढे लोक त्यांच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ घेतात, त्यांना माणतात त्यापेक्षा ते असतांना त्यांना माणणारे, जाणणारे लोक अगदी अल्प होते. असाच अनेक महापुरुषांचा इतिहास आहे. याचे निश्चित कारण काय? याचे निश्चित कारण शोधण्याचा प्रयत्न केल्यास हेच आढळून आलेले आहे की ते महापुरुष स्थूल शरीराने कार्य करीत असताना जगापासून स्वतःला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करत होते. जगत् प्रसिद्धीपासून ते स्वतःला वाचवित होते. ज्यांना त्यांच्या दिव्य शक्तीचा अनुभव आला अशा भक्तांनी त्यांच्या दिव्य शक्तीचा लाभ सर्वांना मिळावा म्हणून त्यांची प्रसिद्धी करण्याचा प्रयत्न केला परंतु तो तितकासा यशस्वी झालेला नाही. कारण ते महापुरुष स्वतःला जगापासून अलिप्त ठेवत आलेले आहेत. स्वतःला झाकून घेत आलेले आहेत. म्हणून त्यांच्या हयातीत जे खरे जिज्ञासू वृत्तीचे होते, त्यांच्या कठोर परीक्षेत जे पास झाले तेच त्यांना जाणू शकले, असा आजपर्यंतचा इतिहास आहे.

स्वतःला अज्ञात ठेवण्याचे अनेक प्रकार आजपर्यंत संतांनी अवलंबिलेले आहे. जसे एखाद्या दरी कपारीत, गुहेत, अरण्यात, एकांतात निवास करणे. ज्या वेळेस लोकांतात आले तेव्हा साधारण वेशात निवास करुन जगाच्या प्रसिद्धीपासून शक्य तितके स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करुन भगवद् भजनात, आत्मानंदात निमग्न राहुन परमानंदाचा आस्वाद घेत राहिले.

असेच एक परमानंदाचा आस्वाद घेणारे, परमानंदात सदैव निमग्न राहणारे एकांतप्रिय परंतु भक्तांनी जगत् उद्धारासाठी त्यांना लोकांतात आणून थोडी फार प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला तरी त्यापासून अलिप्त राहून स्वतःला शक्य तितके अदृश्य अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करुन परमानंदात लीन राहणारे श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्यासंर्दभात पुस्तकाद्वारे माहिती देऊन त्यांना अज्ञात जगासमोर वेळेपूर्वी आणण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. कारण मी काही प्रयत्न केला नाही तरी त्यांचा अगाध महिमा एक दिवस जगासमोर निश्चित येणारच आहे. परंतु इतर महापुरुषांचा लाभ ते महापुरुष स्थूल शरीराने कार्य करत असताना जसा जास्त लोकांना होऊ शकला नाही त्यामुळे असंख्य लोक त्यांच्या दिव्य -



अलौकिक लाभापासून वंचित राहिले तसे स्वामीजींच्या व आपल्या संर्दभात होऊ नये म्हणून माझा हा अल्पसा प्रयत्न आहे.

**स्वामीजींचा परिचय :-** स्वामीजींचा परिचय जगाला कसा करुन द्यावा, स्वामीजींबाबत काय लिहावे याचा मी अनेक महिनेच नव्हे, तर काही वर्षे विचार करत होतो, परंतु काही एक निश्चित निर्णय होत नव्हता. कारण एक तर मी लेखक नाही व लेखनाची मला सवय नाही व त्यातल्या त्यात सामान्य व्यक्तीचा परिचय करुन देणे सोपे आहे परंतु स्वामीजींसारख्या अलौकिक शक्तिसंपन्न महापुरुषांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मला तर अशक्य आहे असा साधा सरळ विचार करुन मी तो प्रयत्न सोडून दिला, परंतु 'जे जे आपणासी ठावे । ते ते इतरांसी सांगावे, । ज्ञानी करुन सोडावे । सकल जन' ।। या समर्थांच्या वचनातील 'जे जे आपणासी ठावे ते ते इतरांसी सांगावे' या ओळीचे माझ्या मनात जणू कोणी तरी परत परत स्मरण करुन देत आहे असा अनेक वेळेस भास झाला व त्यातल्या त्यात स्वामीजींच्या दिव्य सहवासात जी अलौकिक अनुभूतीची - आनंदाची प्राप्ती झाली त्यापैकी एक अंश जरी कोणाला मिळेल तर त्याचे जीवन धन्य होऊन जाईल. *'वाट सांगे त्याच्या पुण्या नाही पार । होतो उपकार अगणित' ।।* या संत वचनाप्रमाणे आपण काही तरी प्रयत्न केलाच पाहिजे, असे वारंवार वाटू लागले.

मोती मिळाला म्हणजे कुटुंबातील व्यक्ती सुखी होतील, या लालसेने जसे अनेक जन अथांग समुद्रात डुबकी मारुन मोती मिळविण्यासाठी प्रयत्न करतात, तसाच स्वामीजींच्या दिव्य चरित्ररुपी सागरातून एखादा सदुपदेशरुपी अलौकिक दिव्य मोती माझ्या आजूबाजूच्या समाजाला मिळावा व त्यांच्या जीवनात सुख - समाधानच नव्हे तर एक दिव्य अध्यात्मिक चेतना निर्माण व्हावी म्हणून स्वामीजींच्या अथांग चरित्ररुपी सागरातून एखादा सद्गुणरुपी लहानसा का होईना मोती काढून तो समाजापर्यंत पोहचवावा हा माझा अल्पसा प्रयत्न आहे.

स्वामीजींचे जीवनचरित्र अथांग पसरलेल्या विशाल सागरासारखे आहे. त्याच्यात असंख्य सद्गुणरुपी मोती आहेत. त्यांच्या विचारातून, आचारातून ते नेहमी बाहेर पडत असतात.

**कबीर लहरी समुद्र की मोती बिखरे आय ।**
**बगुला परख न जानही हंसा चुनी चुनी खाय ।।**

या कबीराच्या विचाराप्रमाणे मात्र काही भाग्यवान विवेकी पुरुषरुपी राजहंसच त्याचे ग्रहण करत आहेत. बाकी असंख्य संसारासक्त स्त्री - पुरुष त्यांच्या विचारापासून वंचित आहेत. त्यांच्यापर्यंत स्वामीजींचे विचार - आचार पोहचावे व त्यामुळे त्यांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा या सद्उद्देशाने स्वामीजींचे हे अल्पचरित्र लिहून त्यात स्वामीजींचा अल्प परिचय द्यावा अशी सद्भावना आहे.

स्वामीजींचा परिचय करुन देणे मात्र तितकेसे सोपे नाही. ते अत्यंत कठीण कार्य आहे. कारण स्वामीजी आपल्या स्वतःबाबत सहसा कोणाजवळ काही बोलत नाहीत. त्यामुळे प्रथम हे कार्य अशक्य आहे असे वाटले होते. परंतु त्यानंतर खूप प्रयत्न केला. स्वामीजींच्या सान्निध्यातील व्यक्ती, त्यांचे लहानपण बघितलेल्या व्यक्ती, ते स्थान इत्यादी सर्व बघितले, त्यांच्याशी चर्चा केली, त्यांच्याकडून काही माहिती मिळाली, तसेच साधनेसंबंधी, योगासंबंधी काही साधकांनी, भक्तांनी, स्वामीजींना जे जे प्रश्न विचारले व त्या प्रश्नांच्या उत्तरांच्या ओघात स्वामीजींनी ज्या अनेक अनुभूती सांगितल्या त्या आधारे, स्वामीजींच्या व स्वामीजींच्या भक्तांच्या सान्निध्यात जास्तीत जास्त कालक्रमणा केल्यानंतर मात्र अशक्य गोष्ट थोडी शक्य वाटली म्हणून मी हा अल्पसा प्रयत्न करत आहे.

**स्वामीजींचा जन्म :-** महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील सारोळा या गावी १० मे १९५७ रोजी स्वामीजींचा जन्म झाला.

**स्वामीजींचे बालपण :-** सारोळा हे गाव अंजना नदीच्या दक्षिणतीरावर बसलेले आहे. ही नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जाते. गावाच्या जवळपास आल्यानंतर मात्र ही नदी उत्तरेकडे वळून गावाला वळसा घालून परत पूर्वेकडे वाहत जाते. ज्या ठिकाणी ही नदी उत्तरेकडे वळसा घेते त्या ठिकाणी गावापासून साधारणतः अर्धा किलोमीटर दूर नदी किनारी ऋषिमुनीप्रमाणे जीवन जगणाऱ्या आई - वडिलांच्या कृपाछत्राखाली स्वामीजींचे बाल जीवन व्यतीत झाले. स्वामीजींची आई धार्मिक तसेच व्यावहारिक बाबतीत अत्यंत कठोर शिस्तीची होती, तर वडिल मात्र भोळ्या



शंकरासारखे. संसारापासून उदासीन वृत्तीचे असले तरी मात्र कर्तव्यदक्ष एक असामान्य पुरुष होते. त्यांच्या आचार - विचारांचे खूप चांगले संस्कार स्वामीजींना लाभले.

**स्वामीजींचे शालेय शिक्षण :-** स्वामीजींचे पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण सारोळा याच गावी झाले. पुढे गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे गावापासून ३ - ४ किलोमीटर दूर नाचनवेल या गावी ५ वी वर्गाचे शिक्षण झाले. त्यानंतर मात्र वसतिगृहात प्रवेश मिळाल्यामुळे ६ वी ते ११ वी पर्यंतचे शिक्षण गावापासून १० किलोमीटर दूर पिशोर या गावी झाले. ११ वी पास झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी स्वामीजी औरंगाबाद येथे आले. तेथे त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालयात १२ वीची परीक्षा पास केली. १२ वीची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनी औरंगाबाद सोडले व ते त्यानंतर नाशिक येथे आले. नाशिकला त्यांनी पंचवटी महाविद्यालयात पुणे विद्यापीठाची बी. कॉम. ही पदवी संपादन केली.

**स्वामीजींबाबतची भविष्यवाणी :-** सारोळा या गावी म्हातारजी या नावाचे एक गृहस्थ राहत होते. ते खूप अधिकारी पुरुष नसले तरी इतरांपेक्षा ते खूप वेगळे गृहस्थ होते. काही मंत्रांची सिद्धी त्यांना प्राप्त होती. त्या आधारे ते जमिनीतील पाणी सांगत काहींचे रोग मंतरलेले भस्म, पाणी, धागा देऊन बरे करत.

स्वामीजी ज्या वेळेस ६ - ७ वर्षाचे होते त्या वेळेस स्वामीजींच्या आई-वडिलांना स्वामीजींबाबत म्हातारजी म्हणाले होते की, ''हा मुलगा खूप भाग्यवान आहे. याच्या कपाळावर महादेवाची पिंड आहे. पुढे तो महादेवाची भक्ती करेल.''

स्वामीजींचे बालजीवन नदीकिनारी ज्या ठिकाणी व्यतीत होत होते त्या ठिकाणाच्या दक्षिणेकडे थोड्या अंतरावर पूर्व - पश्चिम एक रस्ता जातो. तसा वास्तव्य ठिकाणापासून तो रस्ता बऱ्याच अंतरावर आहे. गावात कधी कधी साधूंची एक जमात येत असे. ३० - ४० साधू त्या जमातीत असत. मारुती मंदिराच्या आवारात आप-आपली धुनी पेटवून ते तेथेच साधना, भजन करत. २-३ दिवस वास्तव्य करुन ते निघून जात. असेच एकदा ते गावात आले व दक्षिणेकडील रस्त्याने जाताना त्यातील एक वयोवृद्ध साधू एकटेच शेतात आले. त्यावेळेस

स्वामीजींचे वडिलच शेतात होते. त्यावेळेस ते स्वामीजींच्या वडिलांना म्हणाले 'तुमच्या तीन मुलापैकी मधला मुलगा एक दिव्य महापुरुष आहे तो तुमच्या कुळाचीच नव्हे तर गावाची देखील कीर्ती वाढवेल. त्याच्या सान्निध्यात येणाऱ्याचे कल्याण होईल' असे बरेच काही सांगून ते निघून गेले. त्यामुळे स्वामीजींचे वडिल स्वामीजींना कधीही 'तू' म्हणत नसत व काही गोष्टींची परवानगी मागितल्यास किंवा काही विचारले तर तुम्हाला जसे योग्य वाटेल तसे करा, असे म्हणत.

**स्वामीजींना लाभलेले सुसंस्कार :-** स्वामीजींच्या बाल जीवनावर स्वामीजींच्या आईच्या सुसंस्कारांचा खूपच मोठा प्रभाव पडला. स्वामीजींची आई अशिक्षीत असली तरी माझ्या मुलांनी खूप शिकावे असे तिला वाटे व त्याप्रमाणे मुलांच्या शिक्षणासाठी तिने खूप परिश्रम घेतले. खोटे बोलू नये, चोरी करु नये, विनाकारण कुणाकडे जाऊ नये, या बाबतीत ती नेहमी दक्ष असे; परंतु त्यातल्या त्यात वाईट वर्तनाच्या मुला-मुलीसोबत किंवा व्यक्तीसोबत मुलांना बोलताना जरी बघितले तरी कठोरातील कठोर शिक्षा करण्यास मागे पुढे पाहत नसे. कठोरातील कठोर शिक्षा करण्यास आई अत्यंत कठोर असली तरी ती केवळ प्रेमाचीच मूर्ती होती. आईने कधी प्रेमाने, कधी रागावून, तर कधी शिक्षा करुन मुलांना सुसंस्कारित केले. आईचा स्विामीजींच्या जीवनावर खूप प्रभाव पडला.

५ वी पास झाल्यानंतर स्वामीजी घर सोडून वसतिगृहात राहु लागले. वसतिगृहात, शाळेत स्वामीजींना खूप चांगला शिक्षकवर्ग लाभला. स्वामीजी वसतिगृहात राहत असले तरी त्यांचा जास्तीत जास्त काळ शिक्षकांच्या घरीच जात असे. त्यामुळे अनेक चांगल्या शिक्षकांचा त्यांना सहवास लाभला व त्यामुळे विशेष मार्गदर्शन मिळून आई-वडिलांनी दिलेल्या सुसंस्कारात भरच पडत गेली.

वडिलांच्या साधू स्वभावाचा तसेच वडिल बंधूच्या भजनानंदी स्वभावाचाही स्वामीजींच्या जीवनावर प्रभाव पडला.

**सद्‌गुरु प्राप्ती :-** स्वामीजींना सद्‌गुरुची प्राप्ती कशी झाली याची माहिती स्वतः स्वामीजींनीच माझे 'परम गुरुदेव श्री संत सद्‌गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज' या अल्पचरित्रपर पुस्तकात दिलेली आहे. ते वाचल्यानंतर एक गोष्ट



लक्षात येते की, स्वामीजी मुद्दाम सद्‌गुरुच्या शोधात गेले नाही. त्यांचे गुरुदेवही स्वामीजींकडे आले नाहीत. परंतु हा जो गुरुशिष्य संबंध निर्माण झाला त्यावरुन एक गोष्ट मात्र निश्चित होते की, स्वामीजींचा व त्यांचा गुरुदेवांचा जन्मोजन्मीचा निश्चित गुरुशिष्य संबंध असला पाहिजे म्हणून स्वामीजींना सद्‌गुरुची ओढ लागली होती. स्वामीजींना केवळ योगायोगाने सद्‌गुरुंची प्राप्ती झाली, असे मुळीच म्हणता येणार नाही.

**तुलसी जैसी भवतव्यता तैसी मिलई सहाई ।**
**आपनु आवई ताहि पाहि ताहि तहां लै जाई ।।**

या तुलसीदासांच्या उक्तीप्रमाणे स्वामीजींचा शिकण्याच्या निमित्ताने संयोग झाला असला तरी त्यामागे जन्मोजन्मीचा त्यांचा संबंध होता असेच मानावे लागेल. अन्यथा शिकण्याच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी आश्रमात आले व नंतर संसारात राहून संसाराचे कार्य करु लागले परंतु स्वामीजी मात्र औरंगाबाद येथील आश्रमात आल्यानंतर त्या आश्रमात एवढे रममान झाले की ते महाविद्यालयाचे विद्यार्थी नसून अध्यात्माचे शिक्षण घेणारे ब्रम्हचारी आहेत, असेच दिसू लागले. औरंगाबाद येथील गुरुदेवांच्या आश्रमात आल्यानंतर स्वामीजींनी ३-४ दिवसातच जो आजन्म ब्रह्मचर्य राहण्याचा दृढ संकल्प केला त्यावरुन ते गतजन्माचे कुणीतरी महान योगी होते असेच सिद्ध होते. अन्यथा गुरुदेवांना न बघताही त्यांच्या केवळ आश्रमात राहत असताना केवळ त्यांचे आचार - विचार ऐकूनच असा संकल्प करणे शक्यच नाही.

स्वामीजी घर सोडल्यानंतर प्रथम श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज आश्रम, शिवनगर, औरंगाबाद या आश्रमात महाविद्यालयाचे शिक्षण घेण्याच्या निमित्ताने थांबले व तेथेच त्यांनी आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा संकल्प केला त्यानंतर स्वामीजींना ज्या वेळेस गुरुदेवांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग आला त्यानंतर स्वामीजी प्रत्यक्ष गुरुदेवांच्या सान्निध्यात नाशिक येथील श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज तपोवन नाशिक या आश्रमात राहुन कॉलेजचे शिक्षण घेऊ लागले. नाशिक येथील पंचवटी महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी सद्‌गुरुचे

म्हणजेच श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराजांचे शिष्यत्व पत्करले व अशा प्रकारे अगोदर अध्यात्माचे व नंतर कॉलेजचे शिक्षण सुरु करून एकाच वेळेस अध्यात्माचे व कॉलेजचे शिक्षण सुरु केले.

**स्वामीजींचे अध्यात्म व कॉलेज शिक्षण :-** स्वामीजींनी गुरुदेवांचा मंत्रानुग्रह घेतल्यानंतर ज्या वेळेस पंचवटी महाविद्यालयात प्रवेश घेतला त्या वेळेस स्वामीजी नेमके कॉलेजचे विद्यार्थी होते की गुरुदेवांचे ब्रह्मचारी साधक होते हे सांगणे कठीण आहे.

कारण स्वामीजी कॉलेजचे विद्यार्थी या दृष्टीने विचार केल्यास स्वामीजी नियमित कॉलेजला जात असत. कॉलेजात सर्वांच्या पाठीमागे बसून एकाग्रतेने कॉलेजचा पाठ ते ग्रहण करत. अशा प्रकारे त्यांनी कॉलेजातील बी. कॉम. ही पदवी चांगल्या मार्कानी संपादन केली.

कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच 'ही लौकिक विद्या पोटभरु विद्या आहे व अध्यात्म विद्या हिच खरी विद्या आहे'. या गुरुदेवांच्या वाक्याचे नेहमी स्मरण असे. त्यामुळे त्यांची मुळवृत्ती अध्यात्माकडे होती व गौनवृत्तीने ते कॉलेजचे शिक्षण घेत होते. म्हणून कॉलेजचे शिक्षण घेत असतांनाच त्यांची अध्यात्माची बाजू बघितल्यास ती मात्र अत्यंत विलक्षण होती. कॉलेजातून आल्यानंतर स्नान केल्यानंतर कॉलेजच्या गणवेशाचा त्याग केल्यानंतर जो त्यांना बघे, त्याला हे कॉलेजचे विद्यार्थी आहेत, कॉलेज शिकतात असे कितीही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी ते अनोळखी माणसाला शक्य वाटत नसे. अशी त्यांची राहणी,दिनचर्या व आचार - विचार होते.

कॉलेजचे शिक्षण घेतानाही स्वामीजी साधू - संताप्रमाणे सकाळीच तीन वाजता उठत असत. दररोजचा त्यांचा नित्यक्रम ठरलेला होता. तीन वाजता उठल्यानंतर स्नान इत्यादी आटोपून चार वाजेपूवी ते शर्वायेश्वर महादेवाची पूजा करत. त्यामुळे त्यांना सर्वजण शक्यतो पुजारी म्हणूनच ओळखत. चार वाजेनंतर ते नित्य - नियम विधीत सम्मिलीत होत. सकाळची विधी आरती साधारणतः सहा ते साडेसहा वाजेपर्यंत चालत असे. सात वाजता स्वामीजी कॉलेजात जात. साडेअकरा



बारा वाजता कॉलेजहून आल्यानंतर स्नान करुन नैवेद्य बनवून एक वाजता शर्वायेश्वराची दुपारची पूजा करुन नैवेद्य दाखवून प्रसाद सेवन करत. त्यानंतर आश्रमिय सेवा, अभ्यास, गुरुदेवांच्या सान्निध्यात किंवा कुणी साधूसंत असेल तर त्यांच्या सेवेत ते वेळ घालवीत. संध्याकाळी परत सात वाजता शर्वायेश्वराची पूजा, आरतीला सुरुवात करत. त्यानंतरचा रात्रीचा वेळ त्यांचा सहसा अध्यात्म चिंतनात म्हणजेच ध्यानात, जपात व्यतीत होत असे.

अध्यात्म व कॉलेज शिक्षण ते एकाच वेळी साधत होते. कॉलेजात नित्य जात असूनही काही वेळेस सात आठ दिवसाचे मौनव्रत ते धारण करत. अशा प्रकारे अध्यात्माचा व कॉलेजचा अभ्यास ते एकाच वेळेस करत होते. कॉलेजला सुटी मिळेल त्या वेळेस काही दिवसांचे अनुष्ठान देखील ते करत; परंतु त्यावेळेस कॉलेजचा अभ्यास व आश्रमिय सेवा यामुळे विशेष अध्यात्म साधना मात्र ते करु शकले नाही. त्या विशेष अध्यात्म साधना त्यांनी नंतरच्या आयुष्यात केल्या.

अशा प्रकारे कॉलेजच्या विलासी वातावरणात जाऊनही भगवंताच्या व सद्‌गुरुच्या कृपेमुळे ते कमलपत्रवत त्यापासून अलिप्तच राहिले, कॉलेजच्या जीवनातही अध्यात्म साधना करुन चांगले आचार-विचार आपण चांगल्या प्रकारे पाळू शकतो असा आदर्श त्यांच्या जीवन चरित्रावरुन आजच्या कॉलेज तरुण - तरुणींना मिळू शकतो.

**आईची इच्छापूर्ती :-** स्वामीजी जेव्हापासून आश्रमात व विशेषतः गुरुदेवांच्या सान्निध्यात राहू लागले तेव्हापासून स्वामीजींचा आई, वडिल, भाऊ, बहिण यांच्याशी असलेला संबंध जवळपास संपल्यासारखाच होता. स्वामीजी वर्षामधून एखाद्या वेळेस आईच्या अति आग्रहास्तव घरी जात व एक किंवा जास्तीत जास्त दोन दिवस थांबून आश्रमात परत येत.

असेच ते एकदा घरी आले होते कारण स्वामीजींनी बी. कॉम. ची पदवी संपादन केली व त्यांनी आता नोकरी करण्यापेक्षा संन्यास घेण्याचे ठरविले होते. खरे म्हणजे यापूर्वीच त्यांची संन्यास घेण्याची इच्छा होती, परंतु गुरूदेव 'पहिले कॉलेज पूर्ण करा नंतर बघू' असे म्हणाले होते. आता कॉलेज पूर्ण झाल्यामुळे त्यांची

संन्यास घेण्याची इच्छा होती व त्याप्रमाणे ती इच्छा त्यांनी पत्राद्वारे घरी कळविली होती. त्यासाठी आई - वडिलांची परवानगी मागितली होती. पत्र गावी पोहोचल्यानंतर विशेषतः आईला खूपच दुःख झाले होते व त्यामुळे वडिलभावाने आईची दुःखी अवस्था पत्राद्वारे कळविली होती. त्यामुळे आईला समजवण्यासाठी व आई - वडिलांचा संन्यास घेण्यापूर्वी आशिर्वाद मिळविण्यासाठी ते शेवटचेच घरी आले होते.

स्वामीजी गावी आले तेव्हा आई खूपच दुःखी दिसली. स्वामीजींना पाहून आईला रडू आवरेना. स्वामीजींनी आईला पुष्कळ प्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. शेवटी आई म्हणाली, एवढे शिक्षण घेतले, लग्न करणार नसशील तर नको करु परंतु नोकरी तर कर. आईच्या दुःखाच्या अवस्थेत स्वामीजींच्या कोमल स्वभावानुरुप 'आई तुझी इच्छाच असेल तर नोकरी करेल' असा अनायास शब्द निघून गेला, कारण स्वामीजींचे आपल्या आईवर अत्यंत प्रेम होते. आईचे दुःख स्वामीजींकडून बघितले गेले नाही व अशा प्रकारे लग्न न करण्याची परवानगी आईकडून तर मिळाली. परंतु काही दिवस का होईना, नोकरी करण्याचे वचन स्वामीजींकडून दुःखाच्या भरात आईला दिले गेले.

त्यानंतर स्वामीजी दुसऱ्या दिवशी परत नाशिकच्या आश्रमात येण्यासाठी गाव सोडून निघाले. त्यावेळेस संन्यास व नोकरी या परस्परविरुद्ध दिशांबद्दलचे विचार त्यांच्या मनात असले तरी स्वामीजींच्या मनाचा संन्यास घेण्याचा निश्चय अगदी निश्चित झालेला होता. या घरात आता हे शेवटचेच पाऊल आहे हे स्वामीजींनी मनोमन निश्चित केलेले होते. परंतु आईची इच्छा व आईला दिलेले वचन मोडने मात्र स्वामीजींना शक्य नव्हते. त्यामुळे स्वामीजींच्या मनाची विचित्र अवस्था झाली होती.

परंतु ही अवस्था भगवंत व सद्गुरूकृपेने जास्त दिवस टिकली नाही. कारण याच दरम्यान सद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांनी वेरुळला जे गुरुकुल विद्यालय सुरु केलेले होते, त्याला आता शासकीय मान्यता मिळणार होती, परंतु अद्याप शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पगार मात्र शासनाकडून मिळणार नव्हता.



तो पगार आश्रमाकडून द्यावा लागणार होता. त्यामुळे अनुदान मिळेपर्यंत ज्यांना शक्यतो पगार द्यावा लागणार नाही, जे सेवा भावनेने कार्य करण्यास तयार आहे अशा नावांचा प्रस्ताव गुरुदेवांसमोर आला. तेव्हा गुरुदेवांसोबत असणाऱ्या एका गुरुबंधूने वेरुळला स्वामीजींच्या नावाचा उल्लेख केला. ते ऐकून गुरुदेवांना आनंद झाला. त्यांनी त्वरीत नाशिकहून वेरुळला स्वामीजींना बोलावून घेण्याचे सांगितले व त्याप्रमाणे स्वामीजी नाशिक आश्रम सोडून वेरुळ आश्रमात आले. वेरुळला शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जी यादी शासनाला सादर करावयाची होती त्यामध्ये स्वामीजींचे नाव घेण्यात आले. त्यामुळे आता स्वामीजी नाशिक आश्रम सोडून वेरुळ आश्रमात राहू लागले व अशा प्रकारे ईश्वरी कृपा व सद्गुरु कृपेने स्वामीजींनी आईला दिलेल्या वचनाची व स्वामीजींच्या आईची इच्छापूर्ती झाली.

**वेरुळ आश्रमातील स्वामीजींचा दिनक्रम :-** स्वामीजी नाशिक आश्रम सोडून वेरुळ आश्रमात आल्यानंतर त्यांचा बराचसा दिनक्रम बदलून गेला. स्वामीजी नाशिक आश्रमात असतांना ते कॉलेजचे विद्यार्थी असले तरीही ते आश्रमाचे शर्वायेश्वर महादेवाचे पुजारी म्हणूनच ओळखले जात होते, व त्याप्रमाणे त्यांचा दिनक्रम होता. तो अगोदर वर्णन केलेला आहेच.

परंतु वेरुळला आल्यानंतर मात्र त्यांच्या दिनक्रमात आमुलाग्र बदल झाला. वेरुळला आल्यानंतर स्वामीजी नाशिकसारखेच सकाळी ब्रह्ममुहूर्तावर तीन वाजता उठत असत. परंतु येथे आता मंदिरात पूजापाठ करण्याऐवजी ते तो आपला वेळ ध्यानात घालवित. त्यानंतर चार वाजता गुरुदेव आश्रमात असेल तर त्यांच्यासोबत व नसेल तर कुटियात नित्य नियम विधी घेत. कुटियातील विधी समाप्तीनंतर ते गुरुकुलातील विद्यार्थ्यांची नित्य नियम विधी - आरती घेत व त्यांना प्रवचनाद्वारे अनेक प्रकारे सद्उपदेश करत. त्यांच्याकडून योगासने करुन घेत व नंतर विद्यार्थ्यांकडून ते अभ्यास करुन घेत. त्यानंतर स्वामीजी शालेय तसेच आश्रमिय हिशोब व्यवस्था व इतर आश्रमिय कार्य करत. संध्याकाळी विद्यार्थ्याकडून श्रमदान सेवाकार्य बऱ्याच वेळेस ते करुन घेत. रात्रंदिवस त्यांचा जास्तीत जास्त वेळ विद्यार्थ्यांच्या

सान्निध्यात जात असे. जणू त्यांनी आता विद्यार्थ्यांच्या सेवेचे व्रतच घेतले होते. विद्यार्थ्यांना सुसंस्कार देण्यासाठी ते रात्रंदिवस प्रयत्नशील असत. त्यांचे जसे विद्यार्थ्यांवर प्रेम होते त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचेही त्यांच्यावर अतिशय प्रेम होते. स्वामीजींच्या प्रेमळ स्वभावाचा, चारित्र्याचा, शिस्तीचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर विलक्षण परिणाम तर झालाच परंतु शिक्षकांवरही झाला. सर्व शिक्षक त्यांना प्रेमाने 'दादा' या नावाने संबोधित असत.

**वेरुळ आश्रमातील स्वामीजींची अध्यात्म साधना :-** स्वामीजी वेरुळ आश्रमात असतांना त्यांचा जास्तीत जास्त वेळ विद्यार्थ्यांच्या सान्निध्यात, हिशोब लिहिण्यात व आश्रमिय कामकाज पाहण्यात जात असला तरी त्यांचे मुख्य ध्येय मात्र अध्यात्म साधना हेच होते. त्यामुळे सर्व व्यवहार सांभाळूनही त्यांनी आपल्या अध्यात्म साधनेकडे कधीही दुर्लक्ष केले नाही.

स्वामीजी जवळपास आठ ते नऊ वर्षे वेरुळ आश्रमात थांबले. वेरुळ आश्रमात प्रवेश करण्यासाठी जी कमान आहे त्या कमानीच्या वर जी एक लहानशी खोली होती त्या खोलीत स्वामीजी निवास करीत. त्यामुळे अतिपरिचित व्यक्तींनाच त्यांची खोली माहिती होती. नविन व्यक्तींना ती खोली सहसा लक्षात येत नसे. त्यामुळे तेथे स्वामीजी एकांतात सकाळी व विशेषतः रात्री ध्यानात निमग्न होत.

स्वामीजींचे नाव शाळेतील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यात घेतलेले असल्यामुळे काही वर्षानंतर त्यांना शासकीय वेतन सुरु झाले. ते वेतन स्वामीजी केवळ आईला दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यासाठी घेत होते; परंतु ते वेतन घरी न देता त्या वेतनाचा उपयोग काही विद्यार्थ्यांसाठी व उर्वरीत तीर्थयात्रेसाठी करत.

विद्यार्थ्यांना जेव्हा दिपावली व उन्हाळी सुटी लागे त्यावेळेस स्वामीजी तीर्थक्षेत्री उत्तर भारतात साधनेसाठी निघून जात. उन्हाळयाच्या सुटीत स्वामीजी सहसा हिमालयात किंवा हिमालयाच्या पायथ्याशी अथवा नर्मदाकिनारी जात.

**संन्यास दीक्षेचा स्विकार :-** स्वामीजींचे जरी शाळेत नाव होते तरी ते इतर नोकराप्रमाणे नव्हते. आईला दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यासाठी ते हे कार्य करत होते. तरी त्यांचा दिनक्रम मात्र संपूर्ण एखाद्या विरक्तासारखाच होता. शाळेचा,



आश्रमाचा व्यवहार सांभाळूनही ते स्वतःचे जेवण स्वतः बनवित एवढेच नव्हे, तर स्वतःचे संपूर्ण कार्य स्वतःच करत. त्यांचा आचार - विचार, वेशभूषा व केशभूषादेखील विरक्तासारखीच होती. कार्यालयीन कामकाजानिमित्त अत्यावश्यक प्रसंगी त्यांना तालुक्याच्या अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागे म्हणून ते सुरुवातीला थोडी भगवट रंगाची पँन्ट व नेहरु शर्ट वापरत. त्यामुळे बरेच जण त्यांना मॉर्डन संन्यासी म्हणून संबोधीत असत. संन्याशाचे संपूर्ण अंतरंग लक्षणे त्यांच्यात असल्यामुळे त्यांना संन्यासी म्हणत हे तर ठीक होते. परंतु संन्यास दीक्षा न घेता संन्याशाचे वर्तन मात्र त्यांना योग्य वाटत नसे. उत्तर भारतातील यात्रेच्या - साधनेच्या प्रभावामुळे आपण राजीनामा देऊन सर्व संगपरित्यागी संन्यासी व्हावे अशी वारंवार त्यांना इच्छा होई व त्याप्रमाणे त्यांनी आपला विचार एक दिवस गुरुदेवांना सांगितलादेखील. त्यावर गुरुदेव स्वामीजींना म्हणाले, ''आपण राजीनामा देऊन काय करणार?'' यावर स्वामीजी म्हणाले, 'हिमालयात जाऊन साधना करण्याची इच्छा आहे'. त्यानंतर गुरुदेव क्षणभर काहीच बोलले नाही. जणू अंतर्दृष्टीने काही जाणून घेत असावे. त्यानंतर क्षणभर थांबून गुरुदेव म्हणाले, 'मी आहे तोपर्यंत येथेच रहा. मी गेल्यानंतर तुम्हाला साधनाच करावयाची आहे, मी असेपर्यंत शाळेला राजीनामा देऊ नका' व अशा प्रकारे आईचे वचन पाळतांनाच सद्‌गुरुदेवांचेही वचन पाळण्याची जबाबदारी स्वामीजीवर आली व त्यामुळे शाळेला राजीनामा देण्याचे तूर्त स्वामीजींनी स्थगित केले.

स्वामीजींना आश्रमात थांबवण्यासाठी शाळेच्या व्यवहाराचे बंधन अत्यावश्यक आहे, असे गुरुदेवांना वाटत होते. शाळेच्या व्यवहाराचे बंधन नसल्यास स्वामीजी आश्रमात थांबणार नाहीत. साधनेसाठी ते एकांतात निघून जातील याची गुरुदेवांना चांगली कल्पना होती.

गुरुदेवाचे वय आता ७५ च्या आसपास पोहचले होते, *'माझीया जातीचे मज भेटो कोणी / अंतरीचे धनी फेडावया'* ।। किंवा *'आमचे धन भय विरहीत / पडले आहे मैदानात।।'* अशा अध्यात्म धनाचे घेणारे तयार व्हा ! अशा प्रकारचा उपदेश आता पूर्वीपेक्षा जास्त होत होता. आपली संसारलीला आपणाला लवकरच

संपवावी लागणार असे त्यांना आता स्पष्ट जाणवू लागले होते. त्यांना जी अध्यात्म संपत्ती प्राप्त झाली होती ती सत्पात्राच्या हाती द्यावी असे त्यांना आता वारंवार वाटू लागले होते. यापूर्वी त्यांनी काही सत्पात्र शिष्यांना भगवे वस्त्र देऊन संन्यास दीक्षा दिली होती. अजून काही शिष्यांना संन्यास दीक्षा देण्याची त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांनी स्वामीजींसह इतर काही साधकांना भगवे वस्त्र - मंत्र आदि देऊन संन्यास दीक्षा दिली.

स्वामीजींना संन्यास दीक्षा देतांना गुरुदेवांना विशेष आनंद झाला. *'आनन्द परमानंन्द कैवल्य पद गामीनम् । नमामी शिरसा देवं किं नो मृत्यु करिष्यती'* हा शलोक उच्चारत त्यांनी यांचे नाव *'श्री स्वामी परमानंदगिरीजी महाराज'* ठेवा असे म्हणत नामकरण केले.





अशा प्रकारे स्वामीजींना संन्यास दीक्षा दिली व पुढे अहलाबादच्या विशाल कुंभमेळयात स्वामीजींचा बीरजाहोम आदी अंतिम शास्त्रोक्त संन्यास विधी इतर गुरुबंधूसह करवून घेतला.

**गुरुदेवांचे महानिर्वाण व स्वामीजींचे कठोर साधनेसाठी हिमालयात प्रस्थान :-** १० डिसेंबर १९८९ साली गुरुदेवांचे महानिर्वाण झाले. ज्यांची सेवा करण्यासाठी, ज्यांच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी स्वामीजी आश्रमात थांबले होते व ज्यांची आज्ञा म्हणून शाळेचा, आश्रमाचा व्यवहार पहात होते, ते गुरुदेवच आता महासमाधीत लीन झाल्यामुळे व 'मी आहे, तोपर्यंत माझ्याजवळ राहणे हिच साधना व मी गेल्यानंतर आपणाला साधनाच करावयाची आहे.' या वाक्याचे स्वामीजींना नेहमीच स्मरण होते. त्याप्रमाणे गुरुदेवांचे महानिर्वाण होताच स्वामीजींनी - सर्वांनी विरोध केला तरीही - शाळेला राजीनामा दिला. स्वामीजींनी राजीनामा दिल्यास स्वामीजी वेरुळला थांबणार नाहीत हे सर्वांना माहित होते म्हणून राजीनामा देऊ नये अशी स्वामीजींना सर्वांनी विनंती केली; परंतु स्वामीजींनी तर केवळ गुरुदेवांच्या आज्ञेमुळे आतापर्यंत राजीनामा दिला नव्हता. आता स्वामीजी गुरुदेवांच्या व आईच्याही वचनातून मुक्त झाले होते, आता सर्व बंधनापासून मुक्त होऊन सर्वांना मुक्ती देण्यासाठी ते साधनेला निघणार होते.

स्वामीजींनी शाळेला राजीनामा देऊन शालेय कार्याचा जो त्याग केला त्याचे कारण त्यांच्या त्यागाचा, ज्ञानाचा लाभ केवळ एका शाळेपुरता मर्यादित राहावा, अशी भगवंताची व सद्गुरुंचीही इच्छा नव्हती. एवढेच नव्हे, तर एक - दोन आश्रमांची व्यवस्था पाहण्यासाठीही त्यांच्या अवतारकार्याचा उद्देश नव्हता इतर गुरुबंधूंनी व ट्रस्टींनी त्यांना आश्रमाची व्यवस्था पाहण्याची विनंती केली, गुरुबंधूंची एक कमिटी नेमून त्यामध्ये स्वामींजीचे नाव घेतले परंतु त्या सर्वांचा त्याग करुन स्वामीजी आत्मसाधनेसाठी ईश्वरप्रेरणेने व सद्गुरुप्रेरणेने हिमालयात निघून गेले.

**हिमालयातील कठोर तप - साधना :-** स्वामीजी आश्रमातून निघाल्यानंतर प्रथम ओंकारेश्वरला गेले. तेथे काही काळ नर्मदाकिनारी साधना करुन तेथून काशीला

गेले. काशीत काही काळ वास्तव्य केल्यानंतर त्यांनी हिमालयातील एखाद्या गुफेत साधना करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ते काशीहून निघाल्यानंतर प्रथम सरळ जम्मूला गेले. तेथे काही दिवस थांबून वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन परत पंजाबमध्ये पठाणकोठला आले. तेथून ते हिमालयात हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यातील बैद्यनाथ क्षेत्री गेले. त्यानंतर बैद्यनाथ क्षेत्रापासून दूर एका कलोनिमाता मंदिराजवळील कुटियात साधनेसाठी थांबले. त्या कुटियात थांबल्यानंतर अनेक जिज्ञासू सुशिक्षित भक्तांनी त्यांची खूप सेवा केली व तेथे अल्पावधित त्यांची प्रसिद्धीही होऊ लागली. ही प्रसिद्धी स्वामीजींना साधनेमध्ये विघ्न वाटू लागली. त्यामुळे काही दिवसांनी स्वामीजींनी त्या कुटियाचा त्याग केला. कुटियाचा त्याग केल्यानंतर स्वामीजी साधनेसाठी बैद्यनाथ क्षेत्राजवळील सीतारमणिक गुफेत साधना करण्यासाठी आले. त्यानंतर बराच काळ त्याच गुफेत साधना करत राहिले.

सीतारमणिक गुंफा म्हणजे काही टन वजनाचे अनेक दगड अस्ताव्यस्त ज्या बैद्यनाथ क्षेत्रात उत्तर दिशेला नदीकिनारी पडलेले आहेत, अशी जागा. अशाच एका प्रचंड दगडाखाली नैसर्गिक गुफा बनलेली आहे. ती गुफा साधनेसाठी स्वामीजींना अत्यंत अनुकूल वाटली. कारण ज्यावेळेस बर्फवृष्टी होत असे अशा थंडीतही ती उबदार राहत असे व विशेष म्हणजे त्या गुफेच्या क्षेत्रात कोणी येत नसे. कारण त्या गुफेच्या क्षेत्रात एका पिशाच्याचा निवास आहे, असे त्या भागातील लोक मानत. त्यामुळे दिवसादेखील तेथे कोणी येण्यास भीत असे. त्या क्षेत्रात आढळणाऱ्या मोठमोठ्या नागांच्या भीतीमुळेही त्या गुफेत कोणी थांबण्यास तयार होत नसे. दिवस मावळल्यानंतर तेथे वावरणाऱ्या चित्यांच्या भीतीमुळे कोणाचा येण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे ती गुफा अगदी निवांत होती, म्हणून त्या गुफेत स्वामीजींनी बराच काळ अनेक कठोर साधना केल्या.

**हिमालयातील दिव्यदर्शनः-** स्वामीजींची गुफेत साधना चालू असतांनाच एक दिवस त्यांना मणिमहेश तीर्थक्षेत्राची यात्रा करण्याची इच्छा झाली. हिमाचल प्रदेशात चम्बा जिल्ह्यात हे स्थान आहे. जुलै - ऑगस्ट महिन्याच्या दरम्यान बर्फ वितळल्या नंतर तेथे जाता येते. भरमौरपासून पायी प्रवास करत दोन - तीन दिवसांनी ज्या



ठिकाणी स्वच्छ पाण्याचे एक तळे लागते व शेजारीच शिवलिंगाकार पर्वत आहे, त्यालाच भारतातील कैलास मानतात. अशा परमपावन तीर्थक्षेत्राची स्वामीजींना यात्रा करण्याची इच्छा झाली. २७-८-१९९० ला स्वामीजी पायी प्रवास करत भरमौर, बंदरघाटी, गौरीकुंड इत्यादी पार करत मणिमहेश तलावावर पोहचले. त्या ठिकाणी अत्यंत कडाक्याची थंडी होती. वातावरणात दोन - तीन दिवसापासून खूपच धुके होते. सर्व पर्वत व वातावरण ढगांनी व्याप्त होते. शंभर दिडशे फुटांच्या पलिकडे काय आहे हे अजिबात दिसत नव्हते. काही वेळेस तर दहा - पंधरा फुटांच्या अंतरावरील व्यक्ती किंवा वृक्षही दिसणे अशक्य होत होते. आता आताच बर्फ वितळून त्यानंतर उगवलेल्या जडी बुटीच्या सुगंधामुळे मनात व शरीरात एक नविनच चैतन्य निर्माण होत होते. स्वामीजी ज्यावेळेस त्या मणिमहेश तलावावर पोहचले त्यावेळेस संध्याकाळ होत आली होती. शेजारचा कैलास पर्वत दोन तीन दिवसापासून ढगांनी अक्षरशः झाकलेला होता. सात - आठ दिवसापासून पायी प्रवास करत अनेक संकटांना न जुमानता स्वामीजी त्या ठिकाणी पोहचले होते व भावविभोर होऊन आजूबाजूचे दृश्य पाहत होते, आणि इतक्यात एखादा मोठा चमत्कार व्हावा तसे झाले ! दोन - तीन दिवसापासून ढगांनी झाकलेला कैलास पर्वत अक्षरशः पूर्ण शिवलिंगाकार दिसू लागला. संध्याकाळच्या सूर्यप्रकाशाने जणू तो पर्वत तर प्रकाशमयच वाटू लागला. चालता चालताच स्वामीजींनी निरखून हे भावविभोर दृश्य बघितले. तर काय आश्चर्य ! त्या शिवलिंगाकार पर्वतावर भगवान शिव - माता पार्वती व गणेशाच्या अद्‌भूत दर्शनाने तर एका आनंदाच्या विजेनेच जणू स्वामीजींच्या शरीरात प्रवेश केला व त्यामुळे क्षणभर स्वामीजींच्या शरीरात मोठा कंप निर्माण झाला.त्या परिस्थितीतून स्वामीजींनी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला व स्वामीजी तेथेच डोळे मिटून खाली बसले. त्यानंतर काही वेळ कसा निघून गेला कळलेच नाही. थोड्या वेळाने स्वामीजींनी डोळे उघडले तर सर्व काही परत सामान्य दृश्य होते. कैलास पर्वत पुन्हा ढगात अदृश्य झालेला होता. त्यानंतर मात्र स्वामीजींच्या तन - मनात एक वेगळयाच प्रकारचा उत्साह व चेतना निर्माण झाली.

**एका दिव्य योग्याचे दर्शन व आत्मसाक्षात्कार :-** स्वामीजींना मणिमहेश येथे जे दिव्य दर्शन झाले त्या दर्शनाच्या तंद्रीतच स्वामीजी काही दिवसांनी गुंफेत परत आले. परंतु आता मात्र स्वामीजींच्या तन - मनात आमुलाग्र बदल झालेला होता. स्वामीजी पूर्वीपेक्षा आता एका वेगळयाच तंद्रीत तल्लीन असत. सर्व व्यवहार ते आता त्रयस्थ बुद्धीने करत होते. कधी कधी तर आता शरीर टिकणार नाही असेही त्यांना वाटे. हे सर्व असे का होते असाही प्रश्न कधी कधी त्यांच्या मनात निर्माण होई. अनेक क्रिया शरीरात अचानक होऊ लागे. कधी मन शांत असे तर कधी कधी अनेक शंका - कुशंकांचे तरंग मनात उठत. परंतु हे सर्व विचारणार कुणाला? आसपास एखादे योगी असल्यास त्यांना हे सर्व का होते असे विचारावे असे वाटे, तर कधी कधी स्वतःभगवंतच सर्व समजावून देईल असेही वाटे.

आणि एक दिवस स्वामीजी संध्याकाळी गुंफेत साधनेला बसणार इतक्यात बाहेरुन 'ॐ नमो नारायणाय' असा गंभीर ध्वनी कानी आला. त्या ध्वनीनेच शरीरात एक प्रकारचा कंप निर्माण झाला. स्वामीजी बाहेर येणार त्याच्या आतच ते योगी पुरुष गुंफेत आले. असे तेजःपुंज योगी स्वामीजींनी यापूर्वी कधी बघितले नव्हते. एवढे वृद्ध असूनही सर्व तारुण्याचे लक्षण त्यांच्या शरीरात दिसत होते. त्यांच्या तांबूस जटांमुळे ते अजूनच शोभिवंत दिसत होते. त्याचा आवाज अत्यंत मधुर होता. स्वामीजींना जणू ते खूप दिवसापासून ओळखत असावे त्याप्रमाणे त्यांनी स्वामीजींशी संभाषण केले व जसे अचानक आले तसे अचानक 'अच्छा! ॐ नमो नारायणाय' असे म्हणून निघून गेले. त्यांचे स्वामीजींशी काय काय संभाषण झाले हे तर स्वामीजींनाच माहित परंतु स्वामीजी एकदा बोलण्याच्या ओघात म्हणाले होते की, अनेक अदृश्य योगी अजूनही हिमालयात आहेत व ते नविन साधकांना योगाच्या बाबतीत मार्गदर्शन करतात. त्यावरुन त्यांनी स्वामीजींना योगाच्या बाबतीत मार्गदर्शन केले असणार व त्याप्रमाणे स्वामीजींनी साधना केली असणार; कारण स्वामीजी म्हणत त्या योग्याच्या दर्शनाने व मार्गदर्शनाने साधनेत खूपच प्रगती झाली व मनातील सर्व संदेह निवृत्त झाले.

त्या दिव्य योग्याच्या दर्शनाने व मार्गदर्शनाने स्वामीजींच्या साधनेत खूप



एकाग्रता आली व सर्व संदेह निवृत्त झाले. त्यामुळे स्वामीजींच्या मनात असे का होते, तसे का होत नाही? असे जमेल किंवा नाही? ध्यानानंतर मन परत खाली येणार किंवा नाही? शरीर तर सुटून जाणार नाही ना? आदी प्रश्न निर्माण झालेच नाहीत. त्यामुळे स्वामीजी दृढ निश्चयाने साधनेत निमग्न झाले व त्यानंतर थोड्याच दिवसात स्वामीजींना त्याच गुंफेत आत्मसाक्षात्कार झाला.

**हिमालयातून स्वामीजी परत महाराष्ट्रात येण्याचे कारण :-** स्वामीजी हिमालयात साधनेसाठी गेले होते. त्यांच्या अपेक्षेपेक्षा त्यांना तेथे जास्त अनुकुलताही मिळाली व खूप लवकर आत्म - परमात्म लाभाची प्राप्तीही झाली. स्वामीजींना हिमालयात जातांना कोणत्याही इहलौकीक संपत्तीची, पदाची, पदार्थाची अपेक्षा नव्हती. मानव देहाचे सार्थक व्हावे आत्म परमात्म्याचा साक्षात्कार व्हावा हाच त्यांचा एकमेव उद्देश होता. त्यांचा तो उद्देश खूप अल्पावधीत भगवंताच्या, सद्‌गुरुंच्या व त्या अज्ञात दिव्य योग्याच्या कृपेने पूर्ण झाला. आता याच देवभूमी अशा हिमालयात बाकी आयुष्याची कालक्रमणा करावी अशीच त्यांची इच्छा होती; परंतु भगवंताची - सद्‌गुरुची तशी इच्छा नव्हती की काय? म्हणून स्वामीजींना परत महाराष्ट्रात यावे लागले. याचे कारण घडले ते असे -

स्वामीजी महाराष्ट्र सोडून हिमालयात गेल्यानंतर महाराष्ट्रातील कुणालाही स्वामीजींनी आपला पत्ता दिला नाही. फक्त काशीक्षेत्री एका गुरुबंधूला बंगालच्या एका संन्यासी महात्मामार्फत पत्ता माहित होता. त्यानुसार काशीक्षेत्री निवास करणारे स्वामीजींचे गुरुबंधू एकदा त्यांना भेटण्यासाठी गेले व त्यांनी महाराष्ट्रातील आश्रमिय वातावरणाची कल्पना स्वामीजींना दिली. 'गुरुदेवांच्या महानिर्वाणानंतर व विशेषतः आपण आश्रम सोडल्यानंतर आश्रमात संपूर्ण अशांतता तयार झाली आहे' असे बरेच काही त्यांनी सांगितले व आपण परत महाराष्ट्रात येणे आवश्यक आहे, असेही सुचविले. परंतु स्वामीजींनी आता हिमालय सोडायचा नाही असा निर्धार व्यक्त केला व तो निर्धार ऐकून त्यांचे गुरुबंधू परत आले व स्वामीजी पूर्वीप्रमाणे आपल्या आत्मनंदात तल्लीन झाले.

काही महिन्यानंतर काशीक्षेत्रातील त्यांचे गुरुबंधू स्वामीजींना महाराष्ट्रात

न्यायचेच या निर्धाराने परत आले. त्यांनी स्वामीजींना आश्रमिय वातावरणाची संपूर्ण कल्पना दिली. 'आश्रमात भांडणे, राग-द्वेष व कोर्ट-कचेऱ्या सुरु झाल्या. जे गुरुदेवांना नको होते तेच नेमके आश्रमात घडत आहे' असे त्यांनी स्वामीजींना सांगितले. काही वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या त्यांनी स्वामीजींना दाखविल्या. एवढ्या अल्पावधीत आश्रमात असे वातावरण निर्माण झाले हे स्वामीजींनाही बरे वाटले नाही. आपण सर्व गुरुबंधूनी एकत्र बसून यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे व त्यासाठी आपण महाराष्ट्रात येणे अत्यंत आवश्यक आहे, असा आग्रह त्यांच्या गुरुबंधूने धरल्यामुळे स्वामीजी परत नाईलाजास्तव महाराष्ट्रात आले.

**महाराष्ट्रात परत आत्मसाधनेत निमग्न :-** स्वामीजी महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वगुरूबंधूंना व आश्रमवासीयांना भेटले. आश्रमाशी संबंधित व्यक्तींना, भक्तांना व ट्रस्टींनाही भेटले. त्या भेटीअंती स्वामीजींनी परत आश्रमिय वातावरणापासून स्वतःला अलिप्त ठेवण्याचा मनोमन निर्णय घेतला. केवळ शब्द वापरुन आश्रमिय अशांत वातावरणात काही बदल घडेल असे वाटत नव्हते. म्हणून स्वामीजींनी जणू आपल्या आदर्श आचरणाने, त्यागाने व उच्च अशा आदर्शाने जीवन जगण्याची शिकवणच जगाला दिली. जी अनंत काळापर्यंत सर्वांना प्रेरणादायी ठरेल.

स्वामीजी हिमालयातून महाराष्ट्रात आल्यानंतर जास्त वेळ व्यर्थ न घालविता सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन वेरुळला श्रृंगारनाल्यात गावापासून एक दोन किलोमीटर दूर अशा स्थानी प्रथम गुरूदेवांच्या कुटियात व नंतर साधनेसाठी गुरुदेवांच्याच कुटिया जवळ एक कुटिया बांधून घेऊन त्या कुटियात परत आत्मसाधनेत निमग्न झाले. त्या कुटियात स्वामीजी बराच काळ थांबले. त्या वेळेस त्या कुटियात एकदा साधनेसाठी बसले ते अनेक महिने कुटिया सोडून इतरत्र कोठेही गेले नाही. हिमालयातील साधनेने त्यांच्या ठायी जो दृढ निश्चय, आत्मसाधनेत तल्लीनता, एकाग्रता वसत होती त्याचा प्रत्यय येथे आल्याशिवाय राहिला नाही. ती मनाची अवस्था त्यांनी येथेही टिकवून ठेवली.

**स्वामीजींचे तपोभूमीत आगमन :-** हिमालयातून स्वामीजी महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी परत आपली आत्मसाधना महाराष्ट्रातही सुरु केली. खरे म्हणजे आता



त्यांना त्या साधनेची आवश्यकता नव्हती, कारण त्यांना साधनेद्वारे जे साध्य करायचे होते ते सर्व त्यांनी हिमालयातील गुंफेत साध्य केले होते. आता त्यांना साधनेची आवश्यकता नव्हती. तरीही त्यांनी साधना चालू ठेवली. त्याचे कारण कदाचित जगाला मार्गदर्शक म्हणून भगवंत प्रेरणेने व सद्‌गुरु प्रेरणेनेच त्यांनी साधना चालू ठेवली असली पाहिजे, असे वाटल्याशिवाय राहत नाही.

स्वामीजींनी वेरुळला श्रृंगारनाल्यात साधनेला प्रारंभ केल्यानंतर वेरुळ आश्रमात येण्याचेदेखील बंद केले. मौनव्रत धारण करुन ते साधना करत व सहसा कोणाच्या दृष्टीस पडत नसत. कुणी दर्शनासाठी अथवा भेटण्यासाठी आल्यास ते सहसा टाळत. त्यामुळे स्वामीजी परत हिमालयात गेले की काय, असेच बरेच जणांना वाटू लागले होते. अशा प्रकारे स्वामीजी महाराष्ट्रात असूनही नसल्यासारखे दर्शवित होते व स्वतःला शक्य तितके अदृश्य ठेवण्याचा प्रयत्न करत होते.

कमळ उमलल्यानंतर त्याचा सुगंध जसा पसरल्याशिवाय राहत नाही व तेथे भ्रमर आल्याशिवाय राहत नाही, त्याचप्रमाणे स्वामीजींच्या बाबतीतही घडले. स्वामीजी जणू महाराष्ट्रात नाहीतच असे दर्शवित होते, वागत होते. त्यामुळे अनेकांना त्यांच्या बाबतीत माहिती नव्हती. परंतु काही अधिकारी साधकांना मात्र त्यांची संपूर्ण माहिती होती. कारण स्वामीजींनी जेव्हापासून आश्रम सोडला व अज्ञातवासात (हिमालयात) गेले तेव्हापासून ते स्वामीजींच्या शोधात होते. स्वामीजी परत महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनीच स्वामीजींना परत हिमालयात न जाण्याचा व येथेच एकांतस्थळी साधना करण्याचा आग्रह केला होता. त्यांच्याच जास्त आग्रहास्तव स्वामीजी त्यांनी बांधून दिलेल्या कुटियात साधनेत निमग्न होते.

स्वामीजी श्रृंगारनाल्यातील कुटियात साधना करत आहेत असा सुगावा अंदरसूल येथील भक्तांनाही लागला. अंदरसूल ही संत सद्‌गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज म्हणजेच स्वामीजींच्या गुरुदेवांची तपोभूमी असल्यामुळे खऱ्या संताचा महिमा तेथील भक्तांना चांगलाच माहित होता. संत - असंत यांचा भेद ते चांगल्या प्रकारे जाणत होते. गुरुदेवांचा साधनाकाळ बघितलेली अनेक भक्त मंडळी अद्याप तेथे होती. त्यांनी व इतर भक्तांनी वेरुळला येऊन स्वामीजींना अंदरसूल येथे दत्तजयंती अनुष्ठानानिमित्त

येण्याचा आग्रह धरला. त्यांच्या विनंतीवरुन दत्तजयंती अनुष्ठाननिमित्ताने अंदरसूलला तपोभूमीत स्वामीजी येण्यास तयार झाले. हे ऐकून तपोभूमीतील भक्तांना अत्यंत आनंद झाला. त्यांनी लगेच गाडी करुन स्वामीजींना तपोभूमीत नेले. दत्तजयंतीचे अनुष्ठान आनंदात पार पडले. सातही दिवस तेथे स्वामीजींचे प्रवचन झाले. त्या प्रवचनाने व त्यांच्या दिव्य सहवासाने अंदरसूल येथीलच नव्हे, तर आजूबाजूच्या काही खेड्यातील भक्तगण एवढे प्रभावित झाले की, त्यांनी स्वामीजींना आता यापुढे तपोभूमीतच थांबविण्याचा निर्णय घेतला. तशी विनंती केली. स्वामीजींनादेखील भगवान नागेश्वराचा काही संकेत म्हणा की, गुरुदेवांची व गुरुदेवांच्याही गुरुदेवांची म्हणजेच नागाबाबांची एकमेव भूमी. ज्या भूमीत गुरुदेवांना त्यांनी संन्यास दीक्षा दिली, त्या भूमीत राहण्याची, साधना करण्याची प्रेरणा झाली. अशा प्रकारे वेरुळहून स्वामीजींचे तपोभूमीत आगमन झाले.

**तपोभूमीचा कायाकल्प :-** तपोभूमी म्हणजे महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील अंदरसूल गावाच्या उत्तर दिशेला गावापासून जवळच कोळगंगेच्या किनारी असलेल्या जागृत महादेवाचा परम पवित्र भूमीचा परिसर. अगस्ती ऋषी भगवान शंकराच्या प्रेरणेने ज्यावेळेस उत्तर भारतातून दक्षिण भारतात गेले त्यावेळेस ते जेथे जेथे थांबत तेथे तेथे शिवलिंग स्थापन करुन त्याची पूजा करत. असेच नागेश्वर महादेव मंदिर म्हणजे अगस्ती ऋषी स्थापित शिवलिंग मानले जाते. अनेक लोकांचे ते श्रद्धास्थान आहे. अनेक काळापासून तेथे साधू-संत, ऋषी-मूनी, साधक-भक्त, जप-तप, पूजा-अर्चा, अनुष्ठाने करत आलेले आहेत व करत आहेत.

असेच एकदा स्वामीजींचे गुरुदेव श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज शिवप्रेरणेने येथे आले. त्यांनी १२ वर्षे येथे कठोर तप - साधना केली. साधना काळातच एक नग्न अवस्थेत राहणारे विदेही अवधूत महापुरुष येथे आले. जुन्या दशनामी आखाड्याचे ते तेरा मढीचे नागा संन्यासी होते. त्यांनी गुरुदेवांना येथे संन्यास दीक्षा दिली व येथेच गुरुदेवांना भगवान शिवाचा साक्षात्कार झाला. साक्षात्कारामुळे व कठोर तप साधनेमुळे मुळचीच पावन भूमी अजून दिव्य बनली. साक्षात्कारानंतर काही दिवसांनी सूक्ष्मदेहाने ते येथेच असले तरी स्थूल देहाने गुरुदेव जगत्उद्धारासाठी इतरत्र निघून गेले.



गुरुदेव अन्यत्र निघून गेल्यानंतर तपोभूमी भक्त मंडळीच्या दृष्टीतून थोडी दुर्लक्षित झाली. त्यातल्या त्यात काही गांज्या-भांग सेवन करणाऱ्या व्यसनी व्यक्तींचीही येथे वर्दळ वाढली. त्यामुळे तपोभूमीला एक प्रकारचे थोडे मालिन्य आले.

स्वामीजी येथे आल्यानंतर दत्तजयंतीचे वार्षिक जपानुष्ठान व पारायण खूप भव्यदिव्य स्वरूपात सुरु झाले. गुरुपौणिमा उत्सवच नव्हे, तर महाशिवरात्र यात्रा महोत्सवही सुरु झाला. मंदिराला लागूनच सात एकराचे जमिनीचे क्षेत्र स्वामीजींच्या प्रयत्नामुळे मंदिराच्या परत अधिकार क्षेत्रात आले. अनेक धार्मिक कार्यक्रम होऊ लागले. मंदिरातीलच काय परंतु गावातील व इतर गावातीलही गांज्या-भांगच काय परंतु इतरही अनेक व्यसने कमी झाली. साधकांची, भक्तांची संख्या येथे दिवसेंदिवस खूप मोठ्या प्रमाणात वाढू लागली. बघता बघता येथे ध्यान मंदिर-ज्ञान मंदिर बांधण्यात आले. अनेक फुलांनी बहरलेल्या बागेची निर्मिती झाली. मंदिराचा प्राचिन कोट पडून गेल्यामुळे नविन बांधण्यात आला. दररोज सकाळीच ब्रह्ममुहूर्तावर शेकडो स्त्री-पुरुष आबाल वृद्ध नित्य नियम विधी आरतीला येऊ लागले. भक्तांच्या सोयीसाठी मंदिरासमोरील कोळगंगा नदीवर पूल बांधण्यात आला. नित्य स्वामीजींच्या सत्संग प्रवचनाचा कार्यक्रम सुरु झाला. स्वामीजींसाठी स्वतंत्र बगीच्यात कुटिया उभारण्यात आली. बाहेरच्या जिल्ह्यातील असंख्य गावात स्वामीजींची प्रवचने होऊ लागली. दूरदूरच्या प्रवचनाला जाता यावे म्हणून स्वामीजींसाठी भक्तांनी स्वामीजींच्या नावाने एक मिनीबस त्यांना घेऊन दिली. ज्या गावात, भागात प्रवचने झाले त्या गावातील व इतरही गावातील, भागातील व्यक्ती स्वामीजींची कीर्ती ऐकून नागेश्वराच्या, तपोभूमीच्या व स्वामीजींच्या दर्शनासाठी तपोभूमीत येऊ लागले व तन, मन, धनाने सेवा करु लागले. त्यामुळे पूर्वीच्या स्वरूपात आमुलाग्र बदल झाला. दिवसेंदिवस येथे नवनविनता दिसू लागली. त्यामुळे एक दोन वर्षापूर्वी आलो होतो ती जागा हिच की दुसरी असा क्षणभर प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होऊ लागला. अशा प्रकारे बघता बघता तपोभूमीचा जणू कायाकल्प होऊन गेला.

**भांगसी माता गडाचा जिर्णोध्दार :** महाराष्ट्रातील मराठवाड्यात औरंगाबाद शहराच्या पश्चिम दिशेला जगप्रसिध्द ऐतिहासिक व धार्मिक दृष्टीने अत्यंत प्रसिध्द असा दौलताबादचा म्हणजेच देवगिरीचा किल्ला आहे.

याच देवगिरीच्या किल्याच्या दक्षिण दिसेला देवगिरीच्या किल्यापासून साधारणतः सहा-सात किलोमीटर अंतरावर अत्यंत पावन पवित्र भांगसी मातेचा गड आहे.

देवगिरी किल्याच्या निर्मितीच्या वेळेसच या गडावर अनेक भूयारे खोदण्यात आली असली तरी परंतु हा गड मात्र अत्यंत प्राचिन आहे. अनादी काळापासून भव भयाचा नाश करणारी आदि माया आदि शक्ती म्हणजेच भांगसी मातेचे हे अत्यंत पावन पवित्र व अत्यंत जागृत स्थान आहे.

जो पर्यंत देवगिरीचा किल्ला वैभवाच्या अत्युच्य शिखरावर नांदत होता तो पर्यंत सर्वांची कुलदेवता, कुलस्वामीनी आदि माया आदि शक्ती रूपाने सर्वजन त्या मातेची भक्ती करून शक्ती व मुक्ती प्राप्त करून घेत होते. भांगसी मातेचे गडावर अत्यंत सुदंर असे प्राचिन मंदिर होते. सर्व सामान्य जनतेपासून राजे लोकांपर्यंत सर्वाची भांगसी माता कुलदेवता कुलस्वामीनी होती. मातेच्या कृपा आशिर्वादाने सर्वजन सुखा समाधानाने जीवन जगत होते.

कालांतराने काळ बदलला. अधर्मी, अन्याय, अत्याचार करनाऱ्याची सत्ता देवगिरी किल्यावर निर्माण झाली. प्राचिन भांगसी मातेचे मंदिर उद्ध्वस्त झाले. भक्तांनी गडावर जे अनेक भुयारे आहेत त्या पैकी एका भुयारात भांगसी मातेची स्थापना करून भांगसी मातेची आराधना चालू ठेवली.

परंतु कालांतराने मंदिर नसल्यामुळे भयामुळे, भांगसी माता गड दुर्लक्षित झाला. भुयारे पावसाच्या पाण्यामुळे, दगड मातीमुळे भरत आली. दारूच्या बाटल्या व हाडकामुळे ही भुयारे अजूनच भयावह वाटू लागली. त्यामुळे भक्तांची गर्दी कमी झाली. क्वचितच भक्त मातेच्या दर्शनासाठी येऊ लागले.

दोन हजार साली भांगसी मातेच्या प्रेरणेने महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज भांगसी माता गडावर आले. भांगसी माता गडाची दयनिय दशा बघून



स्वामीजीना अत्यंत दुःख झाले. एवढा पावन पवित्र गड, जागृत मातेचे अधिष्टान परंतु दारूच्या बाटल्या हाडे व केर-कचरा, दगड मातीने, घाण पाण्याने भरलेल्या गुफा बघून स्वामीजींना मोठे दुःख वाटले. परंतु स्वामीजी केवळ दुःख व्यक्त करून स्वस्थ बसले नाही तर मातेच्या कृपाआशिर्वादाने व भक्तांच्या श्रमशक्तीने प्रथम स्वामीजींनी गडावरील भुयारांची स्वच्छता करण्यास सुरूवात केली. अनेक जिल्ह्यातून अनेक गावची भक्त मंडळी स्वामीजींच्या मार्गदर्शनाने रात्रंदिवस कित्येक महिने श्रमदान शक्तीने गुफा स्वच्छतेचे कार्य करत होती.

गुफांची स्वच्छता केल्यानंतर स्वामीजींनी जयपूरहून सुंदर अशी भांगसी मातेची मूर्ती आणली. पहिली शेदूर लावलेली मातेची मूर्ती तशीच ठेवून विधिवत शास्त्र शुध्द पध्दतीने होम हवन म्हणजेच यज्ञ करून भांगसी मातेची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. त्याच बरोबर भगवान शिवाची म्हणजेच शिवपिडींची, नंदीची गणपतीची प्राण प्रतिष्ठा मातेच्या भुयाराच्या जवळच जे विशाल दुसरे भुयार आहे त्या भुयारात करण्यात आली. स्वामीजीचे शिष्य नित्य नियमाने मातेची पूजा अर्चा करू लागले. त्यानंतर स्वामीजीने गडावर लाईटची व्यवस्था केली. त्याच प्रमाणे गडावर जाण्यासाठी गडाच्या पायथ्यापासून तर शेवटपर्यंत पायऱ्याची व्यवस्था केली. रात्री देखील गडावर जाता येईल अशी पायऱ्या भोवती लाईटची व्यवस्था केली. मुख्य रस्त्यापासून गडा पर्यंत डांबरी रोडची ही व्यवस्था स्वामीजींनी करून घेतली. मातेचे अधिष्ठान गडावर भुयारात (गुफेत) आहे. हे सर्वांच्या लक्षात यावे यासाठी मातेचे अधिष्ठाण तसेच भुयारात ठेवून भुयारावर (गुफेवर) एक भव्य मंदिर स्वामीजींनी असंख्य भक्तांच्या सहयोगाने बांधले.

भांगसी मातेच्या भक्तांची व्यवस्था व्हावी, सेवा करता यावी म्हणून स्वामीजींनी मातेच्या गडाच्या पायथ्याशी भक्तांच्या सहयोगाने जवळपास ५० एकर जमिन खरेदी केली त्या जमिनीचा उपयोग आश्रम बांधून भक्तांच्या सेवेसाठी केला. अशा प्रकारे एकेकाळी अत्यंत वैभवाच्या शिखरावर असलला भांगसी माता गड परंतु मध्यतरीच्या काळात अत्यंत दुर्लक्षित झाला होता त्या भांगसी मातेच्या गडाचा जिर्णोध्दार मातेच्या प्रेरणेने, कृपा आशीर्वादाने, शक्ती स्फुर्तीने व असंख्य भक्तांच्या

साह्याने स्वामीजींनी केला. गडाच्या पायथ्याशी असलेल्या आश्रमात स्वामीजींची कुटीया, गुरूकुल, गोशाळा, ध्यानमंदीर इत्यादीची निर्मीती करण्यात आली.

**स्वामीजींचा महामंडलेश्वर पदाभिषकाने सन्मान :** स्वामीजी गडाचे जिणोध्दार कार्य करीत असतांनाच नाशिक-त्र्यबंकेश्वरच्या कुंभमेळयासाठी गेले तसे स्वामीजी या पूर्वीही अहलाबादच्या कुंभमेळयात गेले होते. अहलाबाद स्वामीजींनी सत्संग प्रवचनाचे, अनुष्ठाणाचे खुप मोठे आयोजन केले होते. महाराष्ट्रातून खूप मोठ्या संख्येने स्वामीजींचा भक्तगन त्यांच्या सोबत गेला होता. पंच दशनाम जुन्या आखाड्याने अत्यंत सन्मानपूर्वक पेशवाई व शाही स्नानात स्वामीजींची व्यवस्था केली होती. एवढेच नव्हे तर स्वामीजींना महामंडलेश्वर पदाने सन्मानित करण्याचे ठरविले होते परंतु स्वामीजींनी त्यांना प्रतिसाद दिला नाही.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळयात परत पंच दशनाम जुन्या आखाड्यातील सर्व साधू-संतानी, पदाधिकाऱ्यांनी, भक्तमंडळीनी जास्तच आग्रह धरल्यामुळे स्वामीजी महामंडलेश्वर पद स्विकारण्यास तयार झाले. त्यामुळे साधू, संत व भक्तगणात



खूप मोठा उत्साह आनंद निर्माण झाला. भारत वर्षातील थोर साधू संतानी, महंतानी, महामंडलेश्वर, आचार्य महामंडलेश्वरांनी स्वामीजीचा अत्यंत सन्मान पूर्वक पदाभिषेक सोहळा पार पाडला. त्या वेळेस स्वामीजींचे खूप मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होता.

**भांगसी माता गडाच्या चरणाशी भव्य आश्रमाची निर्मिती :** स्वामीजींना जे भक्त दान, दक्षिणा देतात त्या दानाचा पैसा सर्व जन हिताय, सर्व जन सुखाय कार्यासाठी खर्च व्हावा असा स्वामीजींचा नेहमी अष्टाहास असतो. संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी एक आदर्श आश्रम व्हावा ही स्वामीजींची इच्छा होती. त्या प्रमाणे स्वामीजींना मिळालेल्या दान दक्षिणेतून स्वामीजीनी भांगसी मातेच्या गडाच्या पायथ्याशी जवळपास ५० एकर जमिन खरेदी केली व त्या जागेवर आश्रम निर्मीतीचे कार्य सर्व भक्तांच्या पुण्यवंताच्या सहयोगाने सुरू केले. त्या जागेत मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या वाहणासाठी पार्कीग व्यवस्था करण्यात आली. जे पुण्यात्मा श्रमदान सेवेसाठी येतात त्यांच्या साठी भंडारगृहाची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक वर्षी नवरात्रात जपानुष्ठाण व नवरात्र सोहळा साजरा करण्यात येतो. जपानुष्ठाणला बसण्यासाठी अनेक साधक येतात त्यांना अनुष्ठानाला बसण्यासाठी व सत्संग

प्रवचनासाठी एक भव्य ध्यान मंदिर बांधण्यात आले. ज्या ध्यान मंदिरात नित्य गुरूकुलातील मुले नित्यनियम विधी आरती ध्यान आदि करतात.

साधी राहणी व उच्च विचारसरणी हे स्वामीजीचे ध्येय आहे. स्वामीजी नेहमी प्रवचनासाठी भ्रमण करत असतात. समभावे विचारे शृष्टी स्वरुपसाम्ये सम दृष्टी निवास स्थानाची आटाटी सर्वथा पोटी न धरावी या उक्तीप्रमाणे स्वामीजी निवासाबद्दल नेहमी उदासीन राहत असले तरीही भक्तांनी स्वामीजीसाठी व येणाऱ्या भक्तांच्या दर्शनासाठी एक भव्य कुटिया बांधली.

**गुरूकुलाची निर्मिती :** भारत हा ऋषी,मूनी, साधू, संतांचा शूर,वीर, ज्ञानी पुरूषांचा देश आहे. या देशात अनेक साधू संतानी एवढेच नव्हे तर साक्षात भगवंताने अनेक वेळेस अवतार घेतला व एक आदर्श मर्यादा समाजात स्थापन केली. जसे भगवान रामानी अवतार धारण करून वशिष्ट ऋषीच्या आश्रमात राहून गुरूकुलात विद्या संपादन केली. तेथील सर्व कठोर निती नियमाचे शिस्तीचे पालन केले. सर्वजन सुखाय सर्व जन हिताय राज्य कसे करावे, आई, वडिल, गुरूजन, भाऊ आपल्या पेक्षा जे वयाने, ज्ञानाने मोठे आहे त्यांच्याशी कसा व्यवहार करावा हे सर्व भगवान राम गुरूकुलात शिकले. गुरूची शिकवण सतत ध्यानात ठेवून त्यांनी राज्य केले. त्यामुळे इतके वर्ष होऊनही आजही पुण्यात्मा इच्छा करतात की राम राज्य आले पाहिजे. म्हणजे भगवान रामाने जसे संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी राज्य केले तसे सर्वांच्या कल्याणासाठी राज्य असले पाहिजे व त्याप्रमाणे त्यांनी आचरण केले पाहिजे. सांगायचे तात्पर्य भगवान राम आचार विचार गुरूकुलात शिकले.



या जगात अनेक गींता आहे जसी अवधूत गीता, गुरू गीता परंतू सर्वात श्रेष्ठ एक गीता आहे ती म्हणजे श्रीमद् भगवतगीता. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त करून सांगितलेली श्रीमद्भगवतगीता मानव जातीला व संपूर्ण विश्वाला तारणारी आहे. त्यामुळे ती संपूर्ण विश्वाला मान्य आहे. संपूर्ण विश्वात श्रीमद्भगवतगीतेचा गीता ज्ञानाचा सन्मान केला जातो. गीता ज्ञानामृताचा, उपदेशाचा जीवनात पालन करण्याचा प्रयत्न केला जातो. कारण ते ज्ञान भगवान श्रीकृष्णांनी गुरूकुलात राहून सांदिपनीच्या सानिध्यात प्राप्त केले होते.

सांगण्याचे तात्पर्य प्राचिन काळी ब्रह्मचर्य आश्रम, गृहस्था आश्रम, वानप्रस्थ आश्रम व संन्यास आश्रम अशी आश्रम परंपरा चालत होती. बाल अवस्थेमध्ये मुले गुरूकुलात शिक्षण घेत असे गरीब-श्रीमंत हा भेदभाव विसरून गुरूकुलात विद्यार्थी शिक्षण घेत असे. मुलाचा शारिरीक, मानसिक, आध्यात्मिक व बौद्धीक विकास गुरूकुलात करण्यात येत असे. त्यामुळे एक आदर्श समाज त्या काळी प्रचलीत होता. परंतू आता मात्र गुरूकुल परंपरा काळाच्या ओघात लोप पावत चाललेली आहे.

आजच्या युगात पुस्तकीय व पोटभरू शिक्षणाची व्यवस्था सर्वत्र असली सुशिक्षित समाज बनविण्यासाठी सर्वत्र प्रयत्न होत असले तरी परंतू सुसंस्कारित समाज निर्मीतीचे प्रयत्न व तशी व्यवस्था मात्र क्वचितच बघावयास मिळते.

मुलांचा शारिरीक, बौद्धीक, मानसिक व अध्यात्मिक विकास होण्यासाठी प्राचिन काळाची सुसंस्कारीत संस्कृती जतन करण्यासाठी व आधुनिक काळातील शास्त्रशुध्द विज्ञानाच्या ज्ञान प्राप्तीसाठी स्वामीजींनी गुरूकुलाची उभारणी केली.

बाल अवस्थेत शिकलेली भाषा व प्राप्त झालेले संस्कार मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत टिकतात असा सर्वांचा अनुभव आहे. त्यामुळेच स्वामीजीनी बाल अवस्थेपासूनच मुलांना सुसंस्कार व शिक्षण मिळावे यासाठी गुरूकुल सुरू केले आहे. गुरूकुलामध्ये पहिलीच्या वर्गापासून दहावीच्या वर्गापर्यंत विद्यार्थी शालेय व आध्यात्मिक सुसंस्कारक्षम शिक्षण घेत आहे. साधू संताच्या सानिध्यात, भांगसी मातेच्या पवित्र दैवी शक्ती संपन्न तीर्थक्षेत्रात निसर्गाच्या रम्य परिसरात अनेक

जिल्ह्यामधून विद्यार्थी येऊन गुरूकुलात वास्तव्य करून शिक्षण घेत आहे. पालकांच्या व समाजाच्या सहभागातून साधू संताच्या अथक प्रयत्नातून हे गुरूकुल चालत असल्यामुळे आई वडिलांचे, समाजाचे, साधू संताचे, गुरूजनाचे ऋण आपल्यावर आहे त्या ऋणातून आपण मुक्त होऊच शकत नाही परंतु मुक्त होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. या विचाराचा मुलांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही, त्यामुळे आईवडिलांची, गुरूजनांची साधू संताची व समाजाची जास्तीत जास्त सेवा कशी करता येईल याचा विचार मुलांच्या पर्यायाने भावी पिढीच्या मनात आल्या शिवाय राहूच शकत नाही. एक आदर्श सेवाभावी, भक्त, ज्ञानी विवेक वैराग्यशील समाज घडावा या सद्‌भावनेने स्वामीजींनी गुरूकूलाची सुरूवात केली आहे.

सुरूवातीलाच बारा एकराचा परिसर गुरूकुलासाठी घेतलेला असला तरी परंतु संपूर्ण परिसर गुरूकुलातील मुलासाठी वापरल्या जातो. शारिरीक विकासासाठी आश्रमाचा सकस आहार, प्रशस्त क्रिडांगणे, खेळाचे साधने, मानसिक व अध्यात्मिक विकासासाठी नित्य सत्संग, ध्यान व त्यासाठी भव्य ध्यान मंदिराची उभारणी, बौध्दिक विकासासाठी उच्च शिक्षित पदविधर गुरूजनांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे स्वामीजीच्या गुरूकुलाकडे आदर्श गुरूकुल म्हणून समाज बघत आहे.



**गोशाळेची निर्मिती :** भगवंताचे जे अनेक अवतार होऊन गेले त्यापैकी भगवान श्रीकृष्ण हे पूर्ण अवतार मानल्या जातात. भगवान श्रीकृष्णाने मानवाच्या कल्याणासाठी ज्या अनेक लीला केल्या त्यापैकी एक प्रमुख लीला किंवा कार्य म्हणजे गाईची सेवा. भगवान श्रीकृष्णाने गाईची सेवा तर केलीच परंतू दही दुध लोण्याची चोरी देखील केली. भगवंताने जी चोरी केली ती स्वतःसाठी नव्हे, तर इतर मुलांसाठी गाईचा व गाईच्या दही दुधाचा महिमा भगवान श्रीकृष्ण चांगला जाणत होते. लहान मुले जी या देशाचे नागरिक होणार आहे ते बलवान व बुध्दीमान असणे आवश्यक आहे. मुले म्हणजेच भावी काळाचे भावी नागरीक. समाज बुध्दिवान व बलवान होण्यासाठी सर्व मुलांना गाईचे दुध मिळाले पाहिजे त्यासाठी भगवंताने स्वतःसाठी नव्हे तर इतरासाठी चोरी देखील केली.

स्वामीजींनी देखील गाईचा व गाईच्या दुधाचा महिमा चांगला जाणला होता. गुरूकुलातील मुले बलवान, बुध्दिमान व्हावी व निरोगी असावी म्हणून विशेषतः गुरूकुलातील मुलासाठी गोशाळेची निर्मीती केली. गिरजातीच्या अनेक गाई स्वामीजींनी गोशाळेत आणल्या.

**स्वामीजींचे तीर्थभ्रमण :-** स्वामीजींचे कॉलेजेचे जीवन संपले तेव्हापासूनच स्वामीजींनी जणू अध्यात्ममार्गाचे प्रात्यक्षिक जीवन सुरु केले होते. जे वाचले असेल अथवा गुरु मुखाने जे श्रवण केले असेल त्याची प्रचिती येते किंवा नाही याचा स्वामीजी नेहमी प्रत्यय घेत. स्वामीजी वेरुळला असतांना बऱ्याच वेळेस दिवाळी व उन्हाळयाच्या दरम्यान नर्मदाकिनारी किंवा हिमालयात अथवा हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या हरिद्वार ऋषिकेश आदि क्षेत्रात जात. काही दिवस तेथे वास्तव्य करत; परंतु खऱ्या अर्थाने स्वामीजींनी तीर्थभ्रमण केले ते गुरुदेवांच्या महानिर्वाणानंतरच. स्वामीजींनी कन्याकुमारीपासून तर थेट हिमालयापर्यंतच नव्हे तर नेपाळ, तिबेट, चीन आदि परदेशातीलही तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. अनेक तीर्थक्षेत्री त्यांना खूप चांगल्या अनुभूतीही आल्या. तीर्थक्षेत्रातील भ्रमणामुळे त्यांच्यात दृढ विश्वास, तितिक्षा आदि अनेक गुणांची वाढ झाली. स्वामीजींना तीर्थक्षेत्राचे भ्रमण करतांना विशेषतः हिमालयातील, नेपाळमधील मुक्तिनाथ, तिबेटमधील मानस सरोवर व चीनमधील कैलासाची यात्रा करंताना हजारो किलोमीटर पायी प्रवास करावा लागला. या यात्रा करतांना स्वामीजींना रेल्वे, बस तर काही ठिकाणी विमानाचाही प्रवास करावा लागला.

हे तीर्थ भ्रमण करतांना स्वामीजींना अनेक साधना करणारे, नाना भाषा बोलणारे विविध पंथाचे असंख्य साधू संत भेटले. त्यांच्या नानाविध साधनांचा आचार-विचारांचाही लाभ स्वामीजींना झाला.







ध्यानमग्न स्वामीजी
नेपाळ - तिबेट यात्रा



विलोभनीय दृश्य
अवलोकन करतांना
(मानस सरोवर -
तिबेट)



भयंकर वाऱ्याच्या
झोतातही ध्यानमग्न
स्वामीजी.
कैलास (चीन)

**स्वामीजींच्या प्रवचनाचा शुभारंभ व प्रभाव :-** स्वामीजींनी प्रवचनाला गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखालीच सुरुवात केली. सुरुवातीला स्वामीजी फक्त गुरुकुलातील विद्यार्थ्यांसमोर प्रवचन करत. तर कधी कधी गुरुदेवांच्या आज्ञेने भक्तगणांसमोर क्वचितच प्रवचन करत. गुरुदेवांसमोर प्रवचन करणे मात्र स्वामीजींना आवडत नसे. गुरुदेवांसमोर आपण प्रवचन करु नये, फक्त प्रवचन ऐकत रहावे असे त्यांना वाटे. परंतु केवळ गुरुदेवांचा आदेश म्हणून नाईलाजास्तव त्यांना कधी कधी प्रवचन करावे लागे.

स्वामीजींच्या प्रवचनाला खऱ्या अर्थाने तपोभूमीत आल्यानंतरच सुरुवात झाली. तपोभूमीत स्वामीजींचे प्रथमच सातही दिवस सकाळ-संध्याकाळ दत्तजयंती अनुष्ठान काळात प्रवचन झाले. त्या प्रवचनाने भक्त मंडळी इतकी प्रभावित झाली की त्यानंतर आजुबाजूच्या खेड्यातील भक्त मंडळी स्वामीजींना प्रवचनासाठी निमंत्रित करु लागली. अल्पावधीत तर अनेक खेड्यातच नव्हे, तर अनेक मोठ मोठ्या शहरातही त्यांचे प्रवचन होऊ लागले. त्यांच्‍या प्रवचनाला प्रचंड गर्दी जमू लागली व विशेष म्हणजे त्यांचे प्रवचन अगदी शांततेने व एकाग्रतेने ऐकू लागली. त्या प्रवचनाने मनन करुन हजारो साधक भक्त मंडळी त्याप्रमाणे वागू लागली.

स्वामीजींच्या प्रवचनात अभंग, दोहे, गीता, भागवत, इतिहास, पुराणे, स्मृतीश्रृती, वेदांत इत्यादीमधील श्लोकांचा आधार घेतलेला असल्यामुळे स्वामीजींचे प्रवचन ऐकतांना सर्वजण मंत्रमुग्ध होतात.

स्वामीजींच्या प्रवचनात धर्म, कर्म, आत्मा - परमात्मा, जीव - ब्रह्म - माया, त्याग, विवेक, वैराग्य, भक्ती, ज्ञान, बंध - मोक्ष, संतमहिमा, सद्गुरु महिमा आदी असंख्य विषयांवरील अनुभूतिपूर्ण विचार असल्यामुळे स्वामीजींचे प्रत्येक शब्द हृदयापर्यंत जाऊन पोहचतात. ते शब्द हृदयात असेच साठवून ठेवावे व त्याप्रमाणे आचरण करावे, अशी सद्भावना निर्माण होते.

स्वामीजींचे प्रवचन लहानशा खेड्यात असले किंवा मोठ्या शहरात असले



तरी अशा ठिकाणी स्वामीजींच्या प्रवचनाला प्रचंड गर्दी असते. लहानशा खेड्यात प्रवचन करतांना त्यांना समजेल असेच स्वामीजी प्रवचन करतात. तर मोठ्या शहरात मात्र स्वामीजींची भाषाशैली थोडी वेगळी असली तरी त्यांच्या प्रवचनाचा उद्देश भक्ती, ज्ञान, वैराग वाढवून मानवाने दुर्गुण, दुराचार, व्यसन यापासून मुक्त व्हावे समाजात धर्म, देशप्रेम एवढेच नव्हे तर विश्वप्रेमाची भावना निर्माण होऊन शांतता नांदावी असा असतो.

प्रत्येकाने आई - वडिल गुरुजनांची सेवा करावी. मोठ्यांचा आदर सन्मान करावा. आपल्या आश्रितांचा सांभाळ करावा. येणाऱ्या पिढीला योग्य चांगले संस्कार द्यावेत. असे करत मातृऋण, पितृऋण, देवऋण, गुरुऋणातून मुक्त तर होता येत नाहीच, परंतु मुक्त होण्याचा प्रयत्न करावा अशा अनेक आशयाचा स्वामीजींच्या प्रवचनात बोध असतो.

स्वामीजींचे प्रवचन ज्या भागात होते, त्या भागात एक नव चैतन्य निर्माण होते.



स्वामीजींच्या प्रवचनाचे एक दृश्य

**स्वामीजींचे आचार - विचार :-** स्वामीजींचे महाविद्यालयाचे संपूर्ण शिक्षण झालेले असल्यामुळे त्यांच्या आचार - विचारात जशी आधुनिक वैज्ञानिक विचारांची पकड आहे, त्याचप्रमाणे त्यांनी केलेला संत वाङ्मयाचाच नव्हे तर संत जीवनाचा सखोल अभ्यास, गुरुदेवांचे बघितलेले जीवन चरित्र, उजैन, हरिद्वार, अलाहाबाद, कुंभमेळयातील सत्संग प्रभाव, देश विदेशातील तीर्थभ्रमणासोबतच असंख्य साधू, संत, ऋषिमुनींच्या सान्निध्यात केलेल्या साधनेमुळे प्राचिन काळातील ऋषिमुनी प्रणित आचार - विचारही आहे.

**स्वामीजींची निर्लोभ, निष्काम वृत्ती :-** स्वामीजींसारखी निर्लोभ, निष्काम त्यागवृत्ती शोधूनही क्वचितच सापडेल अशी आहे. स्वामीजींनी ठरविले असते तर खूप मोठी नोकरी मिळविली असती व खूप पैसाही मिळविला असता. परंतु स्वामीजींनी त्या सर्व जीवनाचा, घरच्या संपत्तीचा त्याग तर केलाच परंतु गुरुदेवांच्या संपत्तीचाही संपूर्ण त्याग केला. गुरुदेवांच्या महानिर्वाणानंतर आश्रमाचा त्याग करुन हिमालयात साधनेसाठी जातांना एक पैसाही त्यांनी आश्रमातून घेतला नाही. हिमालयातील साधनेनंतरही आश्रमिय संपत्तीची यत् किंचितही इच्छा बाळगली नाही. स्वामीजी कोणतेही कार्य करतांना निर्लोभ व निष्काम वृत्तीने करतात. कोणतेही कार्य करतांना स्वामीजी त्यात वैयक्तिक कोणताही स्वार्थ ठेवत नाहीत. अनेक भक्त त्यांना दान - दक्षिणा रुपाने जे देतात ते सर्व स्वामीजी परत समाजाच्या कल्याणासाठी वापरतात.

**स्वामीजी व चमत्कार :-** स्वामीजींच्या संदर्भात काही व्यक्ती काही घटनांबाबत, आपल्याला आलेला अनुभव व चमत्कारांबाबत सांगतात. त्या घटना, चमत्कार खरे असेल परंतू स्वामीजी मात्र चमत्काराबाबत संपूर्णतः उदासीन आहेत. चमत्कार,



ढोंग, पाखंड, अवडंबर यांचे स्वामीजींच्या जीवनात मुळीच स्थान नाही. त्यांचे आचार - विचार व आत्मबळ एवढे प्रबळ आहे की त्यामुळेच काही घडणाऱ्या घटना भक्तांना चमत्कार वाटतात.

**स्वामीजींचा शिष्य परिवार :-** महाराष्ट्राच्या अनेक भागात स्वामीजींनी ज्यांना मंत्रानुग्रह दिला असा असंख्य समुदाय पसरलेला आहे. खेड्यापासून शहरापर्यंत गरीबापासून श्रीमंतापर्यंत खूप मोठा आबाल वृद्ध भक्त -साधकांचा समाज त्यांच्या शिष्य समुदायात असला तरी त्यात तरुण सुशिक्षित वर्गाचाच मोठा भाग आहे. ज्यांची खरोखरच साधना करण्याची इच्छा आहे, सर्व व्यसनापासून जे मुक्त आहेत किंवा सर्व व्यसनापासून मुक्त राहण्याची ज्यांची इच्छा आहे; ज्यांचे आचार-विचार, खान-पान, कुल-शिल चांगले आहे. अशाच साधकांना स्वामींजी मंत्रानुग्रह देतात. मंत्रानुग्रह घेतल्यानंतर साधकाने कमीत कमी एक तरी अनुष्ठान करावे, कोणतेही व्यसन करु नये, दुर्गुण-दुराचारापासून मुक्त राहावे. सात्विक आहार करावा, अखाद्य व अपेयाचे सेवन करु नये. आई-वडिलांची, समाजाची सेवा ईश्वर भावनेने करावी. नेहमी सत्संग करावा. दररोज नित्य नियमाने वागून नित्य साधना करावी, अशी स्वामीजींची साधकाकडून साधारणतः अपेक्षा असते. स्वामीजींच्या अपेक्षेप्रमाणे खूप मोठा दुर्गुण, दुराचारापासून व व्यसनापासून निर्मुक्त सुशिक्षित समाज स्वामीजींना शिष्य म्हणून मिळालेला आहे. त्यात दिवसेंदिवस खूप मोठ्या प्रमाणात वेगाने वाढ होत आहे.

**स्वामीजींची महानता :-** स्वामीजींची महानता ज्या ज्या गोष्टीत आहे, त्या सर्वांचे वर्णन करणे अशक्य आहे. ते सर्व वर्णन करणे आवश्यकच आहे असेही नाही. कारण स्वामीजींची महानता वर्णन करुन त्यांना खूप प्रसिद्धी देणे हा माझा उद्देश

मुळीच नाही. जे कोणी अध्यात्ममार्गांचे खरे जिज्ञासू असेल त्यांच्यापर्यंत स्वामीजींचा अल्प परिचय पोहचवावा व त्यांनी स्वतः प्रेरित होऊन अध्यात्माची प्राप्ती करुन घ्यावी अशी इच्छा आहे. अशा खऱ्या जिज्ञासूंना एवढी माहिती पुरेशी आहे, असे वाटते. स्वामीजींसारखी त्यागी, विवेकी, वैराग्यशील वृत्ती, ज्ञान व भक्ती आपल्या जीवनात येण्यासाठी स्वामीजींच्या महानतेची जाणीव करुन घेणे आवश्यक आहे. स्वामीजींची महानता ही त्यांच्या ब्रह्ममय दृष्टीत, निष्काम, निर्लोभ वृत्तीत व त्यांच्या दुर्मिळ अशा आचार - विचारात, सुशिल स्वभावात आणि राग - द्वेषरहित भावनेत सामावलेली आहे. त्यांच्या सान्निध्यात राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली जप, तप, अनुष्ठान करुन त्यांच्या सत्संग प्रवचनाचा लाभ घेऊन असंख्य साधक भक्त स्वतःला धन्य धन्य माणून कृतार्थ होत आहेत. आपणासही त्यांच्या अध्यात्मज्ञानाचा लाभ होवो व आपले जीवन कृतार्थ होवो, हिच ईश्वरचरणी व सद्‌गुरू चरणी प्रार्थना.



## श्री स्वामी परमानंदगिरीजींची आरती

आरती सद्‌गुरूनाथाची । श्री स्वामी, परमानंदगिरीजींची
आरती सद्‌गुरूनाथाची । श्री स्वामी, परमानंदगिरीजींची ।।धृ।।

अवतरले सारोळा गावी । ज्ञानाची शिकवन सर्वांना द्यावी ।
त्या आधी ज्ञान प्राप्ती व्हावी । हिच आस धरोनी, मोहपाश तोडूनी,
गेले गाव सोडूनी । करूनी घेतली प्राप्ती ज्ञानाची ।।१।।

जगाला सद्‌मार्ग दाखवावा । त्या आधी गुरूंचा बोध प्राप्त व्हावा ।
मग त्यांचा आर्शीवाद घ्यावा । हाच उपदेश, मान्य सर्वांस,त्याने पावाल मुक्तिस,
म्हणोनी दिक्षा घेतली । जनार्दन स्वामींची ।।२।।

स्वामीजी बाल ब्रम्हचारी । संन्यास दिक्षा अंगीकारी ।
जप तप तीर्थ क्षेत्री करी । हिमालयाही गेले, गुफेत राहिले, कठोर तप केले ।
प्राप्ती जाहली शिव शंकराची ।।३।।

गावी अंदरसूल आले । नागेश्वरी तपोभूमी राहिले ।
तेथेही तप बहुत केले ।निष्काम भावाने, श्रम दानाने, प्रेम योगाने,
केली उभारनी । ध्यान ज्ञान मंदिरांची ।।४।।

स्वामीजींचा अवतार झाला । धर्माचा उपदेश केला ।
भक्तांना परमानंद झाला । श्रृती स्मृती पुरानें, वेद मार्गाने, धर्म शास्त्राने,
गोडी लावली । भक्ती मार्गाची ।।५।।

दोन हजार तीन सालाला । महायोग कुंभाचा आला ।
सर्व संतांनी, एक मतांनी, दिली पदवी ।
महामंडलेश्वराची ।।६।।

भांगशीमातेचा संदेश आला ।स्वामीजी आले भांगशी गडाला।
निष्काम कर्माने, ज्ञानयोगाने, भक्ती मार्गाने,
कीर्ती वाढविली । भांगशीगडाची । ।।७।।

स्वामीजींची मूर्ती इवली । त्याची कीर्ती चोहीकडे गेली ।
प्रजा त्यांच्या ध्यानी लागली, द्वेष त्यागूनी, प्रेम भावानी, सर्व मिळूनी,
करूया आरती । त्या दिव्य योग्याची ।।८।।